साहामाही " ३ " ८
सालअखेर " ७ " १०८
किरकोळ अंकास ........................ ४

नोटिशीबद्दल.
१० ओळीचे आंत रु० १
पुढें दर ओळीस ०१०६
दुसरे खेपेस ........०१

Six monthly............3 " 8 as
Single copy..................................4as

# वऱ्हाडसमाचार.

Advertisemen
Below 10 lines...2Rs
per line over10... 4 as
Repetition perline 3 as

## THE BERAR SAMACHAR.

VOL XXVII AKOLA MONDAY 13 MARCH 1893 NO. 10

वर्ष २७ आकोला सोमवार तारीख १३ माहे मार्च सन १८९३ इ० अंक १०

## CLEMENTS TONIC

### दुखणेकऱ्यास संजीवनी

### क्लेमेंटचें टानिक.

( दुनियेंचा पौष्टिक दवा )

क्लेमेंटचें टानिक ही रामबाण, त्वरित, आणि काय ती एकच खात्रीची औषधि आहे. तिच्या योगें मज्जूतील क्षीणता, शरीराचा ऱ्हास, चेतनाशक्तीचा हीनपणा, साधारण अशक्तता, कण्यांतलि थकवा, धातुश्राव आणि दुष्ट हवा, मनस्वी क्लेश, दगदग, दुर्व्यसन, दुरुपयोग,मूर्खपणा अगर अविचार या पासून शरीर क्षीण होऊन ज्या व्याधि जडतात त्या सर्व व्याधि व रोग दूर होतात.

क्लेमेंटचें टानिक स्वाभाविकपणेंच मनुष्याच्या शरीराला हुषारी आणते, क्षीण व अशक्त मनुष्यास तजेला व शक्ति देते. कमकुवत मनुष्यास सदृढ, बळकट व वीर्यवान बनवितें आणि नाजूक स्त्रिया बांध्यानें मजबूत व पाणीदार अशा करितें.

तरुण, मध्यम वयाचे, व म्हातारे पुरुष व स्त्रिया यांस खात्रीचे गुणावह औषध म्हणजे क्लेमेंट टानिक असें आढळलें. शारीरीक मानसिक मनस्वी दगदग, दुःख, उघड्या हवेंत राहणें, गुप्तस्राव, छांदिष्टपणा यां पासून ज्यांना विकृति जडतात अथवा ज्यांनीं अज्ञानपणानें व खोडसाळपणानें प्रकृति बिघडून घेऊन स्वतांवर अनेक दुःखें ओढून घेतलीं त्या सर्वांस याचा गुण आला आहे. शरीर क्रमाक्रमानें थकत चाललें असतांना त्या ऱ्हासाचीं लक्षणें या औषधानें तात्काळच नाहींतशीं होतात आणि कमी कमी झालेल्या शक्ति पूर्वी प्रमाणें जोमदार होऊन प्रकृति निकोप होते. मुख्य मुख्य इंद्रियें कमताकत झालीं, मेंदू बिघडला, शरीराचे व मनाचे व्यापार कुंठले, विचारांचा घोटाळा झाला, ज्याचा त्याला भरंवसा वाटेनासा झाला, स्वभाव अनावर व शीघ्र कोपी झाला, उदासीनता व भित्रेपणा वाटला, गुडघे व पाठ थकली, छाती धडधडूं लागली, वातशूल झाला, कंबरेंत सलका मारल्या तसेंच पाठींत दुखणें वेळोवेळ दात दुखणें अवयव तिडकणें झोंप नाहींशी होणें, कपाळ दुखणें पद्धाटेस थकवा येऊन अवयव दुखणें, मूत्रपिंड व मूत्राशय यांची आग होणें लवकी पांढरे होणें परमा व गुप्तस्राव यांनीं धातुपात होणें या व्याधि झाल्या अथवा स्त्रीपुरुषास आपल्या जन्मांतलीं कर्तव्यें व जबाबदाऱ्या बजावण्यास नालायक करणारा व त्यांच्या कामांत व्यत्यय आणणारा असा मानसिक व शारीरिक कोणताही आजार झाला तर या सर्वांवर क्लेमेंटचें टानिक हाच एक उत्तम उपाय ठरला आहे व ठरत आहे.

क्लेमेंटचें टानिक हें खरोखरीच मनुष्यमात्रास एक ईश्वरी देणगीच मिळालेली आहे हें घेतल्या बरोबरच आपला रोगनाशक अद्भुत प्रभाव दाखवूं लागतें. ह्याविषयीं घेणारांची साक्ष सर्वत्र व विश्वसनीय अशी आहे. ते ह्मणतात कीं, ह्याच्या प्रत्येक भागानें गुण येऊं लागतो. हें ज्ञानतंतूचो जबरदस्त शक्ति वाढविणारें टॅानिक असून हें शरीरांतील सर्व अवयवांना व स्नायूंना ज्ञान तंतू योगानें पूर्व स्थितीवर आणणारें शक्तिदायक सत्व पोंहोचवितें; इतकेंच नाहीं पण तीक्ष्ण रोग थकवा, मेहनत, अतिश्रम अथवा कित्येक कुकर्माच्या योगें शरीरप्रकृति अशक्त झाली असली, किंवा जोंवर ज्ञानतंतूंची अशक्तता, साधारण किंवा स्थानिक अशक्तता चालूं असेल तोंवर कोणत्याही कारणानें अशक्तता आलेली असली तरी हे औषध घेतल्यावर गुण आल्यावांचून राहणार नाहीं. जोंपर्यंत क्षीणता व ज्ञानतंतूची अशक्तता हींच रोगाचीं कारणें असतील तोंपर्यंत, क्लेमेंटचें टानिक हाच एक उत्तम उपाय आहे.

रोग्यांनीं लक्षांत ठेवावें कीं क्लेमेंटचें टानिक हेंच एक खात्रीचें औषध आहे, सर्व गांध्याकडे व बाजरांत तें विकत मिळतें F. Moor Clements.ही सही पेटीच्या बुडाशीं व वरच्या भागीं पाहून त्याची खात्री करून घेतांनां सावधगिरी ठेवावी, आणि जे नकली औषधें विकतात त्यांच्या पासून घेऊं नये. ' क्लेमेंटचें टानिक 'नांवानें शोध करा, आणि तेंच अस्सल औषध घ्या. हाड, मज्जा, व स्नायु ही यानें बनतात, आणि रक्त व मेंदु यांना हें फार मानवतें. हें घेतल्यानें प्रकृति सदृढ, बळकट, ताकतदार, आणि जोमदार होते आणि दुनियेंत या सारखी ईश्वरी देणगी दुसरी नाहीं.

इंडियांतील एजंट—कॅंप आणि को, ट्रेचर आणिको मुंबई, बालंटाईन को; स्मिथ, स्टानिस्टिट को, बोनन को, कलकत्ता; डब्ल्यू इ. स्मीथ को, मद्रास; एन. एस. फरनानडो, कोलम्बो; आणि सर्व ठोकळ व किरकोळ गांध्याचीं दुकानें.

F. M. Clements, Inventor Sydney, Australia.

## वेळापत्रक

वऱ्हाड हायस्कूल माजी विद्यार्थी समाजः—

सदरहू समाज यंदा उमरावती येथें ता० १९—२० माहे मार्च १८९३ रोजीं( रविवार व सोमवार ) भरला जाईल समाजाची जागा जेवणखाण वगैरे करितां रेल्वे स्टेशनजिकचे धर्म शाळेंत मांडव देऊन केली आहे. वै सभे करितां नेटीव क्लबची जागा योजिली आहे. समाजाची व्यवस्था खालीं लिहिल्या प्रमाणें ठेविली जाईल.:—

ता० १९ मार्च १८९३ रविवारीं सकाळीं.

६—८ { स्नानें, चहा, काफी वगैरे.

८—९ { अध्यक्षाची निवडणूक मागील सालचा रिपोर्ट वाचून तो मंजूर करणें एकमेकांच्या भेटी वगैरे.

९—१० रा. रा. मोरो विश्वनाथ जोशी बीए ए० एल० एल० बी हे आपल्या इंग्लंडच्या प्रवासाची हकीकत सांगतील.

१०—१२ जेवणखाण व विश्रांती

दुपारी

१--२ गवयाचें गाणें.

२—३ ( १ ) ज्या ज्या गृहस्थांचें शिक्षण सरकारी स्कालरशिपावर झालें आहे व ज्यांस ईश्वर कृपेनें गरीब मुलांस मदत करण्याची शक्ती आहे त्यांनीं सदर्हु स्कॅालरशिपचा पैसा कांहीं मुदतीनें कां परत करूं नये वगैरे बद्दल विवेचन

( २ ) वऱ्हाडांतून बियें. एल. एल. बी. पास झालेल्या विद्यार्थ्यांबद्दल वकिलीच्या परिक्षे संबंधी नवीन सरक्युलरांत विशेष नियम नाहीं तो मागण्याविषयीं विचार.

४—६ रा. रा. विश्वनाथराव काळे वकील यांचे ऋग्वेदांतील साठ ऋच्यावर संभाषण

६—७ खेळ व विश्रांती

७—८ जेवण खाण वगैरे

८—११ गाणें.

ता. २०—३—९३.

सकाळ

६—८ स्नानें, चहा, काफी वगैरे

८—११ ( १ ) वऱ्हाडांतील एका हायस्कुलाला पी. ई० चा वर्ग जोडण्याविषयीं डायरेक्टर आफ पब्लिक इनस्ट्रकशनकडे अर्ज करण्याविषयीं विचार

( २ ) इंग्लिश टीचर ठेवण्या करितां खेडेगांवांतून लोकांना वर्गणी जमा करावी लागते ही पद्धत बंद करून सरकारच्या खर्चानेंच शिक्षक देण्या करितां डायरेक्टर साहेबांस विनंती करणें.

( ३ ) वऱ्हाड हायस्कूल माजी विद्यार्थी समाजा करितां कायमचा चिटणीस नेमणें ह्या शिवाय नेहमीं प्रमाणें दोन चिटणीस असावयाचेच त्या चिटणीसानें कोणतीं कामें करावयाची ह्या विषयीं विचार.

११—१ जेवण खाण वगैरे.

१—३ गाणें, पानसुपारी वगैरे.

३—६ रा. रा. प्रल्हाद नारायण जोग बी. एल. एल. बी. वकील यांचे धर्माचें बीज ह्या विषयावर संभाषण व व्याख्यान.

६—८ खेळ व विश्रांति.

८—११ जेवण व नंतर अध्यक्षाचें संभाषण व समाजाचें विसर्जन.

## अर्थशास्त्र.

( ९ वे अंकावरून पुढें )

श्रम विभागा पासून पुष्कळच फायदे आहेत, परंतु संयुक्त श्रमापासून श्रमाची उत्पादक शक्ती त्याही पेक्षां जास्त वाढते. संयुक्त श्रम ह्मणजे अनेकांचे श्रम एकत्र करून काम करणें.जसे एखादा मोठा चिरा कांहीं उंचीवर चढवायाचा आहे,तर त्यास पुष्कळ मनुष्यें लागलीं तरच तो सहज चढविला जाईल; परंतु एकट्यास फार मेहनत पडून कदाचित तें काम त्याच्यानें होणार ही नाहीं.

ह्या संयुक्त श्रमाचे दोन प्रकार आहेत; एक साधे संयुक्त श्रम; व दुसरा,मिश्र संयुक्त श्रम.वर सांगितला चिरा चढविणें हें पहिल्या प्रकाराचें उदाहरण आहे. ह्मणजे एकाच कामांत अनेक मनुष्यें एकमेकांस प्रत्यक्ष मदत करितात.

दुसऱ्या प्रकारांत अनेकांची एकमेकांस मदत होते, ती एकाच कामांत नसून, निरनिराळ्या कामांत होत असते. उदाहरण, कापसाचें कापड तयार करण्यांत कोणी का, पूस जमीनी पासून उत्पन्न करितात, कोणी त्याची सरकी काढितात; कोणी पिंजतात कोणी एका ठिकाणाहून दुसरें ठिकाणीं नेतात कोणी सूत काढितात व कोणी कापड विणतात. किंवा दुसरें उदाहरण शेतकरी लोक आपल्यास जितकें धान्य पाहिजे, त्या पेक्षां जास्त उत्पन्न करून, तें दुसऱ्या कारखानदारांस देऊन, आपल्याला जे पदार्थ पाहिजेत ते घेतात व कारखानदार निरनिराळे पदार्थ जास्ती उत्पन्न करून ते धान्य उत्पन्न करणाऱ्यास देऊन, त्यापासून धान्य घेतात- ह्मणजे कांहींनीं धान्य उत्पन्न करावें. कांहींनीं कपडा, व कांहींनीं भांडीं करावीं वगैरे.

ह्याच गोष्टी वरून, नवीन वसाहत लोकर भरभराटीस कशी येईल ह्याची कल्पना बसविली आहे.ह्मणजे अशा वसाहतींतप्रत्येक मनुष्यास; त्याच्या कुटुंबास पुरेशी जमीन दिली ह्मणजे झालें, असें नाहीं. कारण अशानें व्यापार वाढण्यास, व सुधारणा होण्यास उत्तेजन मिळत नाहीं. नुसती जमीन असली ह्मणजे, प्रत्येकांस पाहिजे तितके ओबडधोबड, जरूरीचे पदार्थ मिळतील हें खरें. परंतु जास्त पदार्थ उत्पन्न करण्याचे भरीस कोणी पडणार नाहीं. ह्मणून प्रत्येक वसाहतींत शहरची योजना केली असतां, शहरवासी लोक अनेक उपयुक्त पदार्थ तयार करितील व त्यांचा पुरवठा खेड्यास होईल. त्याच प्रमाणें खेड्यांतील लोक धान्य, भाजीपाला वगैरे शेतकीच्या उत्पन्नाचा पुरवठा, शहरचे लोकांस करितील; ह्मणजे ह्या लोकांची परस्परास मदत होऊन सर्वांस सर्व प्रकारचे पदार्थ मिळूं शकतील, व त्या योगानें व्यापार झपाट्यानें वाढून, वसाहतीची सुधारणा तेव्हांच होईल.

हत्यारें व यंत्रें, यांनींही श्रमाची उत्पादक शक्ती पुष्कळ वाढते. प्रत्येक कसबांत हत्यारांची जरूरी लागते हें सांगणें नको, नुसत्या हातांनीं जितकें काम होऊं शकतें, त्याचे दसपट काम हत्यारांनीं होतें, व कांहीं

कामें तर हत्यारांशिवाय मुळींच होत नाहींत. अलीकडे हत्यारांचे जागीं यंत्राचा उपयोग होऊं लागला आहे त्यामुळें तर श्रमाची उत्पादक शक्ती अतीशयच वाढली आहे. सरकी काढण्या पासून तों कपडा तयार होई पर्यंत जीं नानाविध यंत्रें चालूं असतात, त्यांचा व आगगाडीचा विचार केला ह्मणजे, वरच्या ह्मणण्याची सत्यता दिसून येईल. पु. चा.

वऱ्हाडसमाचार

मित्तीफाल्गुन वद्य १० शके १८१४

मुंबईस ' व्हिक्टोरिया टेक्निकल इनस्टीटयूट ' नांवाची यांत्रिकशाळा आहे तिचा गेल्या आठवड्यांत दुसरा वार्षिक बक्षीस समारंभ झाला त्या वेळीं ज्या गोष्टी रिपोर्टावरून व अध्यक्ष नामदार बर्डवुड यांच्या भाषणावरून कळल्या त्या फार उपयुक्त असून प्रत्येक प्रांतांतल्या शाळाखात्यांनीं त्यांचा अवश्य विचार केला पाहिजे. जगामध्यें जीं राष्ट्रें उदयास येऊन वैभवशिखरास जाऊन पोंहचलीं तीं उन्नत स्थितीला येण्यास कारणें त्यांची साम्पत्तिक भरभराटी होय. ही आधिभौतिक समृद्धि होत जाण्यास यांत्रिकज्ञान मूळ उत्पादक कारण असतें. सध्याच्या मन्वन्तरांत यांत्रिक ज्ञाना वांचून जें राष्ट्र राहील त्या सारखें अभागी राष्ट्र कोणतेंच नाहीं. हिंदुस्थानची शोचनीय स्थिती या यांत्रिक ज्ञानाच्या अभावामुळेंच झाली. इंग्लंड आदिकरून युरोपांतील राष्ट्रें यांत्रिक ज्ञानाच्या बलावर धनाढ्य बनलीं आहेत. हिंदुस्थानांतील शिक्षणक्रमांत यांत्रिक शिक्षणाचा लवलेश ही सरकारनें चालूं केला नाहीं ह्मणून इतर देशाच्या कलानैपुण्यानें हा देश अगदीं मागें पडला इतकेंच नव्हे तर येथील हस्तकौशल्यही उत्तेजन नसल्यामुळें विलयास जात चाललें आहे. यांत्रिक शक्तीचा प्रचंड हत्ती हिंदुस्थानाला मिळाल्या शिवाय या देशाचा अभ्युदय होणार नाहीं ह्मणून इतिहासज्ञ लोक वारंवार आपल्या लोकांची कानउघाडणी करीत असतात. परंतु या देशाची पराधीनता व आंधळी राजनिष्ठा अशी विलक्षण आहे कीं, सरकारनें सर्व गोष्टी प्रजेसाठीं केल्या पाहिजेत. यांत्रिक शिक्षण मिळविण्याच्या शाळा विद्यार्थ्यांस फारच थोड्या आहेत. सर्व शिक्षणाचा मार्ग क्रमिकइयत्ता मध्यें संग्रहीत आहे आणि त्या वेगळा मार्ग कोणास ही ठाऊक नाहीं किंवा लोकांच्या क्षुद्र साधनानें दृश्य होण्या सारखा नाहीं. म्याट्रिक्युलेशन पर्यंतचा अभ्यासक्रम व त्या पुढील पाठशाळेतील विद्याभ्यास हे दोन शिक्षणाचे पंथ जनसमूहास ठाऊक आहेत आणि त्यांचा उपयोग यथाशक्ति लोक करून घेत आहेत. परंतु साधारणपणें लिहिणें वाचणें व हिशोब येऊं लागल्या नंतर पुढील उच्च प्रतीचें शिक्षण ज्या लोकांस प्राप्त करून घेण्यास साधनें व सामर्थ्य नसतें त्यांना उद्योगधंद्याचें शिक्षण अवश्य पाहिजे असतें. आणि त्यांना त्यांच्या धंद्यांतील शिक्षण ह्मणजे मुख्यत्वें करून त्या धंद्यांतील यांत्रिक ज्ञान संपादणें हा मूळ भाग होय. हें यांत्रिक ज्ञान मिळण्यास शाळा फार करून नाहींत पण सर्व प्रकारच्या धंद्यांस आवश्यक व साधारण असें यांत्रिक शिक्षण ज्या शाळांतून दिलें जावें अशा प्रकारची वरील 'व्हिक्टोरिया टेक्निकल इनस्टिटयूट' ही एक शाळा आहे आणि इच्या बरोबरीला दुसऱ्या फार बिरळा आढळतील.

या संस्थेला आरंभ होऊन चार वर्षें झालीं. तेथील अभ्यासक्रम तीन वर्षें मुदतीचा असल्यामुळें गेल्या वर्षी १०९ विद्यार्थी पारंगत होऊन बाहेर जगांत उद्योगधंदा करूं लागले. इंजिनियरींग कडील व सुताच्या कारखान्या कडील अशा यांत्रिक शिक्षणाच्या दोन शाखा आहेत. त्यपैकीं पहिल्या शाखेंत ९१ विद्यार्थी असून १८ जण दुसरीमध्यें सरटीफिकीटवाले आहेत. या बहुतेकांस उद्योग मिळाला असून ते आपल्या कामांत चांगले निष्णात असतात. यंदाच्या वर्षी फक्त २५ विद्यार्थी पसार झाले. ही संख्या फार कमी आहे. पहिल्या वर्षी १०९ विद्यार्थी बाहेर पडल्या नंतर लोकांत त्यांची, गरज कमी झाली कीं काय न कळे!

युरोपांतील यांत्रिक शालागृहांतून बसिपासून तीस पर्यंत निरनिराळ्या शाखा विषयीं शिक्षण देत असतात परंतु इंडियांतील शालागृहें फार थोडीं असूनही तेथें त्या सर्व नाहींत ही नवलाची गोष्ट होय. यांत्रिक शिक्षण संपूर्ण देण्या पुरता या शाळेच्या व्यवस्थापकापाशीं पैसा नाहीं. आणि श्रीमान्, उदार, व लोककल्याणकारी लोकांनीं, राजेरजवाड्यांनीं व संस्थानीं या शाळेस मोठा फंड पुरवावा ह्मणून रिपोर्टांत विनंती आहे मुंबई इलाख्यांतील बहुतेक विद्यार्थी आहेत तरी नेटिव संस्थानांतून ५० जण शिकत आहेत मस्कतहून व जाफनाहून दोन दोन विद्यार्थी या शाळेंत शिकण्या साठीं आले आहेत. पण मोठी आश्चर्याची व खेदाची गोष्ट ही कीं वऱ्हाड प्रांतांतून एकही विद्यार्थी त्या शाळेंत नाहीं व त्या शाळेंत धाडण्याविषयीं किंवा तिकडे जाण्याची अभिरुचि लागण्या विषयीं आमच्या प्रांतिय शाळाखात्याकडून कांहीं व्यवस्था व तजवीज झाल्याचें आह्मांस ठाऊक नाहीं.

नामदार बर्डवूड यांनीं आपल्या संभाषणांत सांगितल्या प्रमाणें या शाळेंतील यांत्रिक शिक्षण ह्मणजे निव्वळ मार्गदर्शक आहे. खरोखर दुनियेंत उद्योग करूं लागण्या पूर्वीं गिरण्या कारखाने, व यंत्रालयें या मधून प्रत्येकानें उमेदवारी केली पाहिजे. यांत्रिक शिक्षणानें फक्त एका विशिष्ट प्रकारची ग्रहकशक्ति विद्यार्थ्यांच्या अंगीं येते. वास्तविक यांत्रिक कामें चालविण्यास प्रत्येकानें निरनिराळ्या कारखान्यांतून शिकलें पाहिजे आणि हा कामाचा अनुभव त्या कामा मध्येंच वापरतांना यावयाचा असतो. सार्वजनिक आरोग्य राखण्या साठीं जीं यंत्रें लागतात त्यांच्या संबधानें शिकलेला गृहस्थ मिळावा ह्मणून प्रत्येक मुनसिपालिटीनें कांहीं योजना करावी अशा मतलबाची एक सूचना नामदार बर्डवूड साहेबांनीं केली आहे. हायस्कूलांतून हत्यारें कशीं वापरावीं हें शिकण्या साठीं एक निराळा वर्ग जोडावा ह्मणजे यांत्रिक शिक्षण सुलभ व सोपें होऊन अंगमेहनतही विद्यार्थ्यांकडून चांगली होईल आणि त्यांची शरीरप्रकृति चांगली सदृढ व निकोप राहील. इंग्लंडांतील हायस्कुलांतून असे वर्ग असतात आणि त्या पासून पुष्कळ फायदे होतात तेव्हां या देशांत ही व्यवस्था चालूं झाली तर फार बरें होईल. वऱ्हाड प्रांतांचे डायरेक्टर या नव्या वर्गा संबंधानें कांहीं तजवीज करितील अशी आह्मी उमेद बाळगतों. उपयुक्त गोष्टी करण्याला आमचे राव बहादूर श्रीराम भिकाजी जठार हे नेहमी तत्पर असतात तेव्हां ते नामदार साहेबांच्या या सूचने विषयीं अगत्य विचार करून आपले अभिप्राय प्रगट करितील अशा आशेवर आह्मास स्वस्थ राहिलें पाहिजे.

---

गेल्या दहा बारा दिवसांत सर्व वऱ्हाड प्रांतांत आणि या प्रांता नजिकच्या मध्यप्रांतांतील भागांत पर्जन्यानें त्राहि त्राहि करून सोडलें आहे. आणि या शिवाय मुलुखी मुलुखीं असाच अवकाळीं पावसाचा मारा चालूं आहे असं पत्रें पत्रीं कळतें. विलक्षण गोष्ट कीं भर उन्हाळ्याच्या दिवसांत आषढ श्रावण महिन्यांतील स्थिति प्राप्त झाली आहे. वाटाण्या एवढ्या, क्वचित् बोरा एवढ्या व क्वचित् क्वचित् आंवळा एवढ्या गारा सराल्यानें पडतात. या गारांचा वर्षाव दगडांच्या भडिमाराहून दुस्सह व प्राणावर बेतणारा असतो. मेघांचा गडगडाट फार भयानक होत असून विजा चमकतात आणि पतनाच्या अवसरांत निमिषमात्र आपल्या गर्जनांनीं व तेजःपुंज दीप्तीनीं मनुष्यमात्रास गर्भगलित करून सोडतात. गेल्या शुक्रवारीं सायंकाळचे साडे सात वाजल्या नंतर मेघ, विद्युत् व शिलावृष्टि यांनीं पाव घटका कल्पान्त प्रळयाचें अतिसूक्ष्मरीत्या दिग्दर्शन दिलें. निदान आह्मास असें वाटलें कीं पुराणकथा प्रमाणें जलप्रळय होण्यास अशा सारख्याच कांहीं अद्भुत ईतिसमुच्चय पंचमहाभूतांनीं प्रगट केला पाहिजे. ईश्वरी करणी केवढी अगाध आहे व क्षणामध्यें सर्व दुनिया कशी विपर्यंतर पावेल याची कल्पना त्या वेळीं चांगली करितां आली. ईश्वरी क्षोभाचीं जीं लक्षणें सांगतात त्यापैकीं अकालीं पाऊस हें एक होय. वऱ्हाड प्रांतांत या क्षोभामुळें प्राणहानि, पिकांची नासाडी, व मालमत्तेचा नाश हीं सर्वत्र थोडीबहुत आढळून येतात.

गेल्या पावसाळ्याच्या आरंभीं सरकारी अंतरीक्ष विद्येचे वेत्ते अंमलदारांनीं मागील वीस वर्षांच्या हकीकती वरून जें अनुमान काढलें होतें त्यामध्यें व प्रत्यक्ष स्थितीमध्यें जमीन अस्मानाचें अंतर दिसून पडलें. त्यांच्या अनुमाना प्रमाणें वऱ्हाड प्रांताला जेम तेम कट्टाकट्टी बेताचाच पाऊस मिळावयाचा होता परंतु यंदा पाऊस दर वर्षीच्या सरासरीपेक्षां दुप्पटीनें होऊन गेला आणि सध्यां तर पर्जन्यानें येथें तळच दिला आहे. सारांश मनुष्याचें अज्ञान फारच फार आहे आणि त्याअर्थीं अनुमान बांधण्याला त्याजजवळ माहिती पुरेशी नसल्यामुळें तें अनुमान खोटें ठरलें आहे यांत विशेष नवल तें काय? सृष्टीतील चमत्कार परिवर्तनानें वारंवार दृष्टीस पडतात तरी ते कधींही एकाच स्वरूपाचे नसतात. नेहमी त्यांच्यामध्यें फरक दिसून येतात, आणि हा भिन्नपणा उत्पन्न करणारीं कारणें अनेक, अगोचर, व अचिरस्थायी असतात. त्यांच्या परिणामावर मनुष्याचें निरीक्षण पोंचत नाहीं. आणि तें पोंचे पर्यंत सृष्टीतील पंच महातत्वांवर आपली 'हुकमत' चालणार नाहीं. अगर त्यांच्या संबंधानें आपलें अनुमान यथार्थ ठरणार नाहीं.

---

## सार्‍यांत सूट पाहिजे.

यंदा खरीपाचीं पिकें पाऊस फार झाल्यामुळें बुडालीं तरी रब्बीच्या उत्पन्नावर आमच्या प्रांतांतील शेतकरी लोकांची मोठी आशा होती पण ती सांप्रतच्या अतिवृष्टीमुळें निष्फळ होणार आहे असें धोरण दिसतें. मागेंच आह्मी सरकारी सार्‍यांस सूट मिळाली पाहिजे ह्मणून लिहिलें होतें परंतु शेतकरी निराश झाले नव्हते आणि त्यांना रब्बीचीं पिकें हात देतील असा भरंवसा होता ह्मणून त्यांच्या कडून फारशी गडबड व चळवळ झाली नाहीं पण आतां मात्र खात्रीनें कठीण प्रसंग त्यांच्यावर येऊन बेतत आहे. सार्‍याचा दुसरा हप्ता सुरू झाला ह्मणजे रयतेला सूट न मिळेल तर सावकारांचीं घरें पाहिलीं पाहिजेत. अगोदरचें कर्जबाजारी रयत आहे आणि तशांत अशी विघ्नपरंपरा घडून आली ह्मणजे सरकारा वाचून रयतेचा दुसरा वाली कोण आहे? जोंधळ्याचें पीक कमी आल्या बरोबर बाहेरील मुलखांतुन जोंधळा वऱ्हाडांत येऊं लागला आहे आणि आतां गहूं वगैरे सुद्धां येऊं लागेल. मोठ्या आश्चर्याची व खेदाची गोष्ट कीं ज्या वऱ्हाड प्रांतानें मागील महाराष्ट्रांतील दुष्काळाच्या वेळीं धान्य पुरविलें त्या प्रांतांत धान्याचा सांठा एक वर्ष भर निभाव लागेल असा नसावा. तेव्हां अशा आपत्तीच्या समयीं सरकारानें प्रजेला सूट दिली पाहिजे किंवा निदान कमी व्याजानें कर्जाऊ पैसा दिला पाहिजे.

मलकापुरास नव्या तरमबंदी प्रमाणें सारा वाढविला आहे तो वाढवूं नये ह्मणून सरकारास अर्ज करण्यासाठीं गेल्या आठवड्यांत मलकापुरास टोलेजंग सभा भरली होती आणि तेथें अर्ज करण्याचा सर्वानुमतें विचार ठरला. मलकापुरास जी गोष्ट लागूं आहे ती सर्व प्रांताला लागूं होणार आहे तेव्हां त्याबद्दलची चळवळ प्रांतभर झाली पाहिजे. आणि या बाबतींत सभा ज्या ज्या ठिकाणीं भरतील तेथें यंदाच्या वर्षासंबंधानें सरकारानें कांहीं सवड व सवलत दिली पाहिजे ह्मणून सरकारास अर्ज करण्या करितां अगोदर व्यवस्था झाली पाहिजे. हें महत्वाचें काम या प्रांतांतील शिकलेल्या सवरलेल्या, अनुभवी व पुढारी लोकांनीं गरीब व मुक्या कुणबी लोकांच्या कल्याणासाठीं अवश्य केलें पाहिजे आणि ते तसें न करितील तर तें आपल्या कर्तव्यांत चुकले इतकेंच नाहीं तर सार्वजनिक व लोकोपयोगी सत्कार्यांत हात घालण्याचा त्यांस अधिकार पोंचत नाहीं असें ह्मणणें लागेल.

The Berar Samachar

MONDAY MARCH,
13 1893.

Mr. Keene's contribution to

Rulers of India series edited by Sir W. Hunter is excellent in every way. We are deeply thankful to him (Mr. Keene) for it. The Rulers of India series excepting a few ancient biographies in it is more or less an unpleasant reading to an Indian. The reason is obvious and is not far to be sought. Nearly every act of the particular hero who happens to be the subject of a memoir is extolled, however dire it may have been in its consequences. This statement will be found to be true when the reader reads the life of Dalhousie a former Governor General of India. His unsound, unchristian, and cruel policy of annexation brought about the Indian Mutiny of 1857 and yet his biographer Sir W. Hunter not only defends but applauds it. To turn from regions so unpleasant to such delightful and instructive biographies as the present one is really consoling.

Mahadji Sindhia's life may be summed up in one sentence. He was bold in action and cautious in danger. If any ruler of India ever possessed the capacities and cleverness of the English it was without doubt our hero Madhava Rao Sindhia. He was indeed a precursor of the English in every way.

His life is brief but it is nevertheless eventful. He was born about the year 1730 A. D., was known to have earned a good reputation as a soldier in the wars with the Nizam and his then allies the French. This was about the year 1751. He was one of those who returned from the battle-field of Panipat which nearly crushed the Marathas in 1761. He bore upon his person the marks of that battle inflicted upon him by a Pathan who pursued our hero, robbed him of all his jewelry, and made him lame for all his life. He took a prominent part in the defeat of the English at Talegaon and wrung out from them the terms of the convention at Wadgaon. He acted as a plenipotentiary in the treaty of Salbaye which was effected between the Marathas on one part and the English on the other. He subjugated Rajputana and Bundelkhand and directed the affairs of the Emperor at Delhi and as a result of this obtained for his master the Peshwa the Viziership of the empire and for the Hindoo religion the abolition of the killing of horned cattle in the whole of the empire. He came to Poona to offer the Viziership to the Peshwa whom he made an admirer of himself and after a short but eventful stay died there in 1794.

This in brief is the life of the man. The most important feature in it is the character of MadhaoRao. How he successfully combated against circumstances under which men of less capacities would have miserably succumbed and how he raised the nation to which he belonged in the estimation of the world is a narrative at once interesting and encouraging.

Like his heroic predecessor Bajirao I, Mahadaji held out before himself a noble ambition. His ideal was to control and to direct the administration of the Empire. Bajirao's ambition was the complete subjugation of the whole of Hindustan to the Hindoo Power as existing in the Marathas; while our hero knowing full well the circumstances of his times placed a less ambitious scheme before himself. Mahadaji attained his object and once more showed that the Hindu race (meaning of course all the permanent residents of India) is able to hold its own against foreign invasion and influence. So successful was he in his scheme that even Warren Hastings advised the Prince Imperial to seek the assistance of Mahadji Sindhia. The Emperor Shah Alam speaks of Mahadji Sindhia as his son. Says the Emperor:—And "Mahadji Sindhia who is a son to me will avenge my cause:"

(to be continued)

The latest number of the Poona Sarvajanik Quarterly contains an interesting and instructive note on Education in Baroda; and we are of opinion that the para culled below will give a fair idea of our present requirements and will also point out the very slow march of national education as a whole:—

"In India, such a disciplinary struggle has only just commenced, and democratic life is just having its humble beginning. And in this state of things, however, we may wish for a wide diffusion of education among the masses, the room for voluntary action is still vast, and until the limits of voluntary efforts are reached, and a clear necessity for compulsory methods arises, a recourse to compulsory legislation in the matter will be without adequate justification. But another and practically a stronger, objection to resorting to compulsory legislation in regard to popular education is to be found in the fact that, neither in the Baroda State nor in British territory, is there as yet any adequate provision of educational facilities made. In the free countries of Europe and America, where education is general—whether on the compulsory or voluntary basis, the establishment of a requisite number of schools is obligatory by statute. In Prussia, every or commune must maintain a school supported by local rates. In Italy, every commune must have one lower grade school for boys, and one for girls. In Spain, there must be a primary school for every 500 inhabitants; and similar provision is made obligatory by law in the other countries of Europe. In England, by the education Act of 1870 it is laid down that sufficient school accommodation must be provided in every District for all the children resident in such District between the ages of 5 and 13. A similar Act applies to Scotland also. Thus, in all these countries, there is not a commune, a village, or a parish, but is bound by law to provide sufficient school accommodation for its children. In India, nothing strikes an outside observer so much as the utter inadequacy of the existing supply of schools to meet the requirements of the country. In British India, Government while fully recognizing its duty in this regard, openly confesses its inability to find the requisite funds for the task, and though increasing efforts are being made in all directions to increase the number of educational institutions still there are hundreds and thousands of villages and hamlets all over the country where schools do not exist. In all India we have hearly one school for every four villages, *i. e.* 75 villages in every 100 are without schools. In Bombay, 66 out of every 100 villages have no school. In the Northern Division of Bombay, about 60 per cent villages still remain unprovided for. In the Baroda State, out of a total of 3012 villages, only 465 have school accommandation, the remaining 2500 villages and more, or 85 villages in 100 have no schools within reach. Similarly, again, the low castes nowhere come in for any fair share of school accommodation for their children. In the Baroda State, the low caste Hindus, on the basis of their numbers being 10 p. c. of the population, probably number more than 200,000 but there are, only 10 Antyaja schools with a total attendance of 800 children."

## अमोलिक संधि.

मॅट्रिक्युलेशन पास होऊन वकिलीचा अभ्यास पुरा झालेला इसम योग्य वेतन घेऊन मुक्त्यारी करण्यास तयार आहे. कायद्याच्या अज्ञानामुळें येणारे प्रसंग व कित्येक वेळां होणारा विनाकारण खर्च टळणार आहे तर व्यवहारी लोकांनीं ही संधी दवडूं नये. पत्रव्यवहाराचा पत्ता "वऱ्हाडसमाचार छापखान्यांत "क" यांस.

## वऱ्हाड

मि. शापूरजी विरजी एक्स्ट्रा. असि. कमिशनर यांची बदली वाशिमाहून आकोल्यास झाली होती पण ती रद्द करण्यांत आली आहे.

मि. आर. ए. सिंम्पसन असि. कमिशनर यांस गेल्या १ले तारखे पासून एक महिन्याची हक्काची रजा मिळाली आहे. आणि मि. मिडी असि. कमिशनर यांस तारीख १६ मार्च पासून १५ दिवसांची हक्काची रजा देण्यांत आली.

एप्रिलच्या पांचवे तारखेस उमरावतीस असि. कमिशनर्स, एक्स्ट्रा असि. कमिशनर्स आदिकरून अंमलदारांच्या डिपार्टमेंटल परीक्षा होणार आहेत.

आकोल्याचे असि. कमिशनर सय्यद शमसुद्दीन अली खान बहादूर यांस असिस्टंट कमिशनरचे पूर्ण मुलकी अधिकार मिळाले.

राव बहादूर श्रीरामभिकाजी जठार बी. ए. डायरेक्टर यांस येत्या २२ वे तारखे पासून तीन महिन्यांची हक्काची रजा मिळाली.

आणि लिहिण्यास फार आल्हाद वाटतो कीं राव बहादुरांच्या रजेंत इतर प्रांतांतून दुसरा कोणी मनुष्य न आणितां आकोला हायस्कुलचे हेडमास्तर मि. जी. सी. एटकीन यांस आफिशिएटिंग डायरेक्टर नेमण्यांत आले. मि. एटकीन हे फार जुने हक्कदार, अनुभवी व त्या कामांत वापरलेले असे गृहस्थ आहेत तेव्हां त्यांची योजना योग्य स्थलीं झाली हें पाहून आह्मी आनंद मानतो.

सन १८९३ एप्रिल पहिली पासून मुनिसिपालिटी यवतमाळास नव्यानें सुरू होणार असल्या कारणानें ऐसा मुनसिपालिटींत चौदा सभासद असावयाचे त्यांची नावें नेमस्त होऊन गेल्या रेसिडन्सी आरडरमध्यें प्रसिद्ध झाली आहेत. एकंदरीनें स्थानिक स्वराज्याचा फैलाव वऱ्हाडांत चांगलाच होत चालला आहे.

आकोला तुरुंगाचे असि. जेलर मि. कालान्स यांस कांहीं गैरकामाबद्दल राजिनामा देण्याचें भाग झाल्यावरून त्यांच्या जागीं रा. रा. गोपाळ विश्वनाथ टोकेकर यांस नेमलें. ही निवड मोठी संतोष कारक झाली.

## जाहिरात

सर्व लोकांस कळविण्यांत येतें कीं कमेटीचे हद्दींतील कचरा वाहून नेण्याचा, स्लटर हाऊसचा, स्टेशन धर्मशाळेचा. व आठवडे बाजारचा कर वसूल करण्याचा वगैरे मक्त्यांचा सन १८९३।९४ सालाकरितां हराज तारीख २८ माहे मार्च सन १८९३ इसवी रोजीं सकाळीं ७॥ वाजतां टौन हालांत केला जाणार आहे. ज्यांस घेण्याची इच्छा असेल त्यांनीं सदर्हू तारखेस हजर राहण्याचें करावें कळावें तारीख ९।३।९३

मुनि० आफीस आकोला } Gopal Hari. Secretary.

## जाहिरात.

नमुना नं. १४३

कोणी स्थानापन्न होतो तेव्हां त्यास कर्ज वसूल करितां येण्यासाठीं सरटीफिकिट मिळावें ह्मणून त्यानें जिल्हे कोर्टास अर्ज केल्या विषयीं जाहिरात.

सन १८८९ चा आक्ट ७ कलम ३ प्रमाणें.

र. नं. ११ क्लास नं. १५ पैकीं मि. नंबर७ / १८९३

वि. सिव्हिल जडज्य साहेब बहादूर जिल्हा बुलडाणे यांचे कोर्टांत.

अर्जदार त्रिंबक बापाचें नांव उमाकांत राहणार देऊळघाट ता० चिखली जिल्हे बुरडाणें यास सयस उमाकांत

बापाचें नांव महिपराव राहणार देऊळघाट ता। चिखली जिल्हे बुरडाणें यांचें कर्ज वसूल करितां येण्या साठीं सरटीफिकिट मिळावें सदरहु अर्जदार यानें अर्ज केला आहे यांज करितां सदर्हु मयत मनुष्याचें माल मिळकतीवर किंवा तिचे कांहीं भागांवर आपला हक्क आहे ह्मणून ज्या मनुष्याचा दावा असेल त्यास जाहिरातीचे व्दारे कळविण्यांत येतें आहे कीं त्यानीं ता.२८ माहे मार्च सन १८९३ इ० रोजीं सदर्हू अर्जाची चौकशी होईल त्यावेळी या कोर्टांत हजर होऊन आपआपले हक्का विषयीं लेखी हकीकत दाखल करावी. आज ता. ८ माहे मार्च सन १८९३ इ०

P. Govindraz.
सिविल ज्यडज्य
जिल्हे बुरडाणे

## अकोला बाजारभाव

हुंडी मुंबईची दर्शनी.... .... .... १००
" १५ दिवसांच्या मुदतीची.... ९९॥=
सुवर्ण २५॥.... .... रुपें .... १०८॥
मीठ....३॥– .... आळशी मापी ११६
जवस वजनी ९८.... चणे ६२॥
गहूं काठे.......... ८२॥ बनशी....८७॥
साखर.... ३॥....कराळे.... .... ४।=
उडीद....३।.... .... मुग२॥।
ज्वारी ५५....५७॥ ....सर्की....५॥–
तूप....९।– .............. तेल७॥
कापूस....५२–५६..............रुई ७६–७८

सव्याचे भाव ( इंग्रजी )
गहूं वैशाख शुद्ध १९१९........ ६७
आळशी चैत्र "........"........ १०६
रुई फाल्गुन.........."........
सर्की वैशाख नवे सालची"........ ....५।
ज्वारी.... वसंत........"........ ०

## वर्तमानसार.

मधमाशीचे पंख एका सेकंडांत हवेंत १९० वेळां फडफडतात व ते मधमाशीला एक तासांत ३० मैल घेऊन जातात.

यमुना नदीला पूर येऊन नावेचा पूल पार वाहून गेला.

अमेरिकेंत एकानें आपल्या मालाच्या जाहिराती रेल्वेच्या काठानें चरणाऱ्या गाईच्या अंगावर लावल्या आहेत. क. णू.

ब्लोंडिन— नांवाचा कोल्हाटी हल्ली ६० वर्षांचा झाला आहे. तरी हा दोरीवरून चालण्यांत त्याची बरोबरी करणारा कोणी नाहीं. नुकतांच त्याने म्यान्चेस्टर येथे एक खेळ करून दाखविला. त्यावेळी १८८ फूट लांब दोरी ८० फूट उंचीवर बांधून त्यावरून तो चालत गेला. मध्यावर गेल्यावर तेथें चहा करून पिऊन दुचाकी गाडी दोरीवर ठेवून त्यावरून पुढे गेला.

आकस्मिक मृत्यू— हैद्राबाद येथील नागेश लक्ष्मण मोहोळकर दुय्यम वकील हे गेल्या शनिवारी सायंकाळीं तेथीलच एक पारशी वकीलाचे घरीं गेले असतां त्यांनीं ठेवलेले गोळी बार भरलेले पिस्तूल सहज उचलतांच घोड्यास धक्का लागून ते खुर्चीवरच प्राणास मुकले.

कोल्हापूर स्टेट रेल्वेचा फांटा समुद्र किनाऱ्याकडे वाढविण्याचे संबंधानें घांट माथ्या पर्यंत रेल्वे करण्या करितां कोल्हापूर कौंन्सिलाकडून सांकशन मिळाल्याची वार्ता असल्याचे ज्ञानसागर वरून समजतें.

हल्लीं काश्मीरांत अतिशय थंडी पडली आहे. तेथे दूध चहा देखील गारठून थिजून जातो.

पलटणींचे शिपाई रेल्वे प्रवास करूं लागले ह्मणजे त्यांचे भाले बंदुका ठेवण्यास स्वतंत्र सोय केलेली नसते आणि त्यामुळें गैरसोय होऊन त्याकरितां गाडींत पुष्कळ जागा अडते. ह्मणून सरकाराने गाड्यांना आंतून हूक वगैरे ठोकून तशी व्यवस्था करावी असा हुकूम केला आहे.

इटाली देशांतील एक पाद्री, मांजर आणि कुत्रा—टैबर नदीच्या कांठीं एक पाद्री राहतो. एके दिवशीं मांजरानें त्याच्या घरांतून एक रत्तल मांसाचा तुकडा पसार केला. हें पाहून त्यानें कारभाऱ्यास त्या मांजरास एका पोत्यांत बांधून पोतें नदींत टाकून देण्यास सांगितलें. त्या प्रमाणें कारभाऱ्यानें मांजराची मोट बांधून नदींत फेकून दिली. हा सर्व प्रकार पाद्री साहेबाचा कुत्रा जवळ उभा राहून पाहत होता. मोट नदींत टाकतांच त्यानें ही पाण्यांत उडी टाकली, व पोहत जाऊन ती मोट आपल्या दातांनीं धरून काठावर आणली, व जमिनी वरून ओढीत चालला. थोड्या वेळानें पोतें फाटलें, मांजर बाहेर निघालें. व कुत्रा व मांजर अशी ऊभयतां पाण्यानें चिंब भिजलेली पाद्री साहेबांच्या दारीं येऊन उभीं राहिलीं. त्यांस पाहून साहेबासही दया आली. आणि मांजर मारून टाकण्याचा विचार त्यांनीं सोडून दिला. 'बरें करण्यानें वाइटाला जिंक' हें वचन कुत्र्याला माहित नव्हतें. पण त्यास अनुसरूनच त्यानें वर्तन केलें.

शु० सू०

मुधोळ संस्थानांत ढवळेश्वर येथें एका बाईस पहिल्यांदा एक मुलगा झाला व त्या नंतर दोन दिवसांनीं आणखी दोन मुली झाल्या. तिघेही सुखरूप आहेत. !!!

पश्चिम आफ्रिकेंत ६०,००० कवड्या दिल्या ह्मणजे तरणी बायको विकत मिळते. आणि तरणीच पाहिजे असा हट्ट नसला तर २०,००० कवड्यांत मिळते.

शक्तीचा विलक्षण प्रभाव. पुरातन ग्रीक लोकांमध्यें मिलो ह्या नांवाचा कोणी एक विलक्षण शक्तीमान पैलवान होऊन गेला. त्याचा जन्म इ० सनापूर्वी ५२० व्या वर्षीं झाला त्यानें अलिंप्स आणि पिथियन येथील कसरतींत एकसारखा सहावेळ जय मिळविला. एका प्रसंगीं तो आपल्या खांद्यावर बैल घेऊन चार मैल धावत गेला. नंतर त्यानें त्या बैलास आपल्या मुटक्याच्या एका सपाट्यानें मारून त्यास अशेष एक दिवसांत खाऊन फस्त केलें. ह्या खादाड राक्षसाचा नेहमीचा अहार ह्मटला ह्मणजे २० पौंड भाकर ४० पौंड मांस आणि दारूचे १५ पाइंट हा असे! !

एका रशियन आफिसरानें खबूतरांच्या ऐवजीं फाकन नांवाच्या पक्षास निरोप नेण्याचें काम शिकवून तयार केलें आहे. खबूतरांपेक्षां फाकनपासून अधिक फायदे आहेत. खबूतर एका तसांत २३ पासून ३० मैल वेगानें ३०० मैल सहन जाऊं शकते; आणि फाकन दर तासास ४५ मैल प्रमाणे १५ तास अनायासें मार्ग क्रमण करतो; परंतु खबूतर असें क्वचित करूं शकतें. फाकन क्यानरी बेटांहून स्पेन देशांतील ड्यूक आफ लर्मे यानकडे पाठविला होता तो ॲन्डाल्यूशियाहून टेनरिफ येथें ७५० मैल १६ तासांत जाऊन परत आला. शिवाय फाकन खबुतरापेक्षां अधिक ओझें नेऊं शकतो आणि हवेच्या संबंधानें अडचणी सोसण्यास अधिक समर्थ असतो. ह्या कामीं प्राचीनकाळीं कावळ्याचा ही उपयोग करीत असत.

प्रसिद्ध विद्युत्तत्ववेत्ते एडिसन साहेब यांनीं एक नवीन दूरदर्शक यंत्र शोधून काढलें आहे. दुर्बिणीच्या सहाय्यानें समोरचे पदार्थ मात्र दिसतात. परंतु ह्या यंत्रानें आजूबाजूचेही पदार्थ शेंकडो मैलांच्या अंतरावरून दिसतात.

क्यूबा नामक बेटामध्यें एक प्रकारचे ढेकूण असतात, त्यांची लांबी सुमारें दोन इंच असत. ते आपल्या पाठीवर उलटे पडले ह्मणजे आपलें पंख फडफडवूं लागतात व अवसान घेऊन उडतात, तेव्हां त्याच्या अंगांतून काजव्या प्रमाणें प्रकाश पडतो. ह्या जातीचे दहाबारा किडे एका पिंजऱ्यांत घालून ठेविले ह्मणजे त्य[illegible] प्रासून वाचावयास येण्या पुरता चांगला उ[illegible] पडतो.

सूक्ष्मदर्शक यंत्राच्या सहाय्यानें असा शोध लाविला आहे कीं मनुष्य मात्राच्या स्वरूपामध्यें जसा व्यक्तीव्यक्तीच्या ठिकाणीं कांहींना कांहीं विशेष फरक असतो त्याच प्रमाणेंच त्यांच्या केसांचाही प्रकार आहे. ह्मणजे एका मनुष्याचे स्वरूप जसे दुसऱ्याच्या स्वरूपाहून भिन्न असते व ओळखतां येतें त्याच प्रमाणें एखादा केंस अमुक मनुष्याच्या डोक्यांतील आहे किंवा नाहीं हे त्याच्या डोक्या वरील केंसांशीं ताडून पाहून सांगतां येतें. एकदां एका खुणाच्या खटल्या मध्यें एक केंस पुराव्यादाखल आणिला होता तो आरोपीच्या केंसासारिखाच रंगानें दिसत होता परंतु तो त्याचाच आहे किंवा नाहीं. हें निश्चयात्मक ठरवावें ह्मणून तो केंस वैद्याच्या स्वाधीन केला. वैद्यानें परीक्षा करून ठरविलें कीं आरोपीच्या केसांहून तो इतका भिन्न आहे कीं, त्यास दोष मुक्त करण्यास हरकत नाहीं. मागाहून खरा खुनी मनुष्य सांपडला त्याचे केंस पुराव्यांत दाखल केले त्या केसाशीं ताडून पहातां त्या सारखेच आहेत असे आढळते. सु० प०

कुइन्सलांड येथें महा पुरानें जो प्रळय केला त्यांत तीन चार कोटीचे नुकसान झाले.

कागो संस्थानांत व्हाानशी लढाई चालू असून त्या सरकारच्या फौजेने गुलाम धरणाऱ्यांचा पराभव करून ५०० लोक कैदही केले.

करगुलन बेटे फ्रेंच अरमाराने आपल्या ताब्यांत घेऊन खालसा केली.

नैनीतालकडे बर्फाची समृद्धी चालूच असून शेतकीचा बिघाड होण्याच्या भीतीनें शेतकरी लोक घाबरत चालले आहेत. पाऊसही झपाट्यानें पडतच आहे. गेल्या वीस वर्षांत अशी हवा कधीं पाहाण्यांत आलेली नाहीं असें सांगतात.

सोहती इन्कम्टाक्सासपात्र आहेत असे मद्रास सरकारानें ठरविलें आहे.

ईस्ट इंडिया रेलवेंतून काडतुसांनी भरलेल्या २५ पेट्या कलकत्याहून फिरोजपूर येथें जात असतां वाटेंत अलाहाबादेच्या जवळपास चोरट्यांनी त्या काडतुसांच्या पेट्या चालत्या आगगाडींतून काढून चोरून नेल्या व त्यांचा पत्ता नाहीं असें सांगतात. काडतुसें ह्मणून नेल्या कीं पैसा ह्मणून नेल्या कोण जाणे. चोरट्यांस काडतुसांचा काय उपयोग.

आह्मी आपला लढा लवादापुढें ठेवण्यास तयार आहों, पण आमच्या राष्ट्रांत जीं माणसें आहेत त्यांच्या शरिरांतल्या रक्ताचा शेवटचा थेंब खर्चीपर्यंत आल्सेस व लोरेन हे प्रांत सोडण्यास आह्मी तयार नाहीं असें जर्मन प्रधानाने ता. २८ रोजीं बोलून दाखविलें.

इंग्लंड पुन्हा लवकरच क्याथलीक धर्माचे होईल अशा आशी आहे असें व्हे पोप यांनीं परवां बोलून दाखविलें पोप यांचें तें अनुमान चुकीचें आहे, कारण आतां सर्व युरोप हळू हळू मुसलमान होऊन नंतर सर्व पृथ्वी हिंदु व्हावयाची आहे.

चमन येथें असलेल्या इंग्रज सरकारच्या पलटणींतील पठाण शिपायी पलटणींतून पळून जाऊन अफगाण हद्दींत निघून जात आहेत. परवां एक पठाण स्वार किल्याच्या तटावरच्या लोखंडी धराडीस आपल्या पागोट्याचा एक पदर बांधून तें खालीं सोडलें. व त्यावरून खालीं उतरून बंदुकीसह पळून गेला व कंदहारकडे गेला. त्याचा पकडण्याचा यत्न झाला पण तो व्यर्थ गेला. एक लष्करी गोऱ्या कामदाराचा घोडेवाला तर घोड्यासह पळून गेला! असें होण्याचें कारण काय कोणजाणें.

अमिरानें कबूल केल्या प्रमाणें आपलें ह्मणणें काबूल येथील कारखान्यावरचा पीन साहेब यांच्या मार्फत हिंदुस्थान सरकाराकडे पाठविलें आहे. ठा० अ०

प्रसिद्धपत्रक.

प्रतिपच्चंद्ररेखेव वर्धिष्णोर्विश्ववंदिता

मुद्रा शहासुनस्यैषं शिवराजस्य राजते

## श्री शिव छत्रपति

किंवा

तत्कालीन एक एतिहासिक कादंबरी.

अलीकडे मराठी भाषेच्या उत्कर्षार्थ जागजागीं अनेक यत्न चालू आहेत, व चांगली चांगली वाचनीय वर्तमानपत्रें, मासिक पुस्तकें, व इतर पुस्तकेंही निघूं लागली आहेत. व त्याचे योगानें मनोरंजन सदुपदेश इतिहास, शास्त्रीय विषय, इत्यादिकांचें ज्ञान संपादण्याचे मार्ग बरेच मोकळे होत चालले आहेत. ह्या कामीं थोडा बहुत तरी हातभर लावावा या हेतूनें बडोदे शहरांतील कांहीं विद्वान गृहस्थांचें मदतीनें "सद्विचारिणी" या नावाची सभा आज दोन वर्षें स्थापन झाली श्री. रा. सा. संपतराव गायकवाड श्री. रा. ब. गणपतराव गायकवाड, ( ब्यारिस्टर ॲट ला व सरदार कोर्टाचे जज्ज बडोदे ), व रा. ब. यशवंत वासुदेव अठल्ये ( एम्. ए., एल्. एल्. बी., असून नायब दिवाण राज्य बडोदे ) हे या सभेचे अनुक्रमें अध्यक्ष, उपाध्यक्ष, व अग्रेसर ( चेअरमन ) असून, या सभेपुढें आजपर्यंत बऱ्याच गृहस्थांकडून निबंध वगैरे वाचण्यांत आले आहेत, व त्यांपैकीं कांहीं मालारूपानें या सभेचे अध्यक्षतेखालीं प्रसिद्ध करण्याचा विचार आहे. या मालेचे हें पहिलें पुष्प रा. रा. शिवराम गोविंद फाळके यांनीं तयार केलें असून, त्यांत हिंदुस्वातंत्र्याचे जनक जे श्रीशिवाजी महाराज, त्यांस हिंदुपद बादशाहीची स्थापना करण्यास कोणती घोरतम संकटें सोसावी लागली, व त्यांतून युक्तिमार्गानें ते कसे पार पडले, व दूरवर नजर पोंचवून हिंदुपद बादशाही दृढ करण्यास त्यांस काय काय उपाय योजावे लागले, वगैरे विषयांचे वर्णन केलें आहे. तरी प्रत्येक महाराष्ट्रभाषाहितेच्छूकडून या पुस्तकास पूर्ण आश्रय मिळेल अशी आशा आहे.

ह्या पुस्तकाची डेमी अष्टपत्री सांच्याचीं सुमारें २०० पृष्ठे होतील. खालीं सही करणार यानकडे रोकड वर्गणी अगर खात्रीलायक सही मार्च १८९३ अखेरपर्यंत देणारांस टपाल हांशिलासह इंग्रजी नाण्याचा एक रुपया पडेल. पुस्तक मार्च १८९३ अखेर तयारी होईल. पुस्तकांत श्रीशिवाजी महाराजांचें सुंदर चित्र देण्यांत येईल. छपाई व बांधणी मोहरेदार होईल आगाऊ आश्रयदात्यांची नांवें पुस्तकांचे शेवटीं छापिली जातील. १२ प्रती घेणारांस किंवा १२ ग्राहक मिळवून देणारास १ प्रत फुकट दिली जाईल.

बडोदे तारीख १७—२—९३

शंकर मोरो रानडे. बी. ए.
भानु केशव गांगनाईक,
सद्विचारिणी सभेचे चिटणीस.

---

☞ हें पत्र आकोलें येथें के० वा० खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

सालअखेर ,, ७ ,, ३०८
किरकोळ अंकास ......................४

Six monthly............3 ,, 8 as
Single copy...............................1as

नोटिशीबद्दल.
१० ओळीचे आंत रु० १
पुढें दर ओळीस ०१०६
दुसरे खेपेस ........०१

Advertisemen
Below 10 lines...2Rs
per line over10... 4 as
Repetition perline 3 as

# वऱ्हाडसमाचार.

THE BERAR SAMACHAR.

VOL XXVII AKOLA MONDAY 20 MARCH 1893 NO. 11

वर्ष २७ आकोला सोमवार तारीख २० माहे मार्च सन १८९३ इ० अंक ११



## CLEMENTS TONIC

## दुखणेकऱ्यास संजीवनी

## क्लेमेंटचें टानिक.

( दुनियेचा पौष्टिक दवा )

क्लेमेंटचें टानिक ही रामबाण, त्वरित, आणि काय ती एकच खात्रीची औषधि आहे. तिच्या योगें मज्जूंतील क्षीणता, शरीराचा ऱ्हास, चेतनाशक्तीचा हीनपणा, साधारण अशक्तता, कण्यांतलि थकवा, धातुश्राव आणि दुष्ट हवा, मनस्वी क्लेश, दगदग, दुर्व्यसन, दुरुपयोग, मूर्खपणा अगर अविचार यां पासून शरीर क्षीण होऊन ज्या व्याधि जडतात त्या सर्व व्याधि व रोग दूर होतात.

क्लेमेंटचे टानिक स्वाभाविकपणेंच मनुष्याच्या शरीराला हुषारी आणते, क्षीण व अशक्त मनुष्यास तजेला व शक्ति देते. कमकुवत मनुष्यास सदृढ, बळकट व वीर्यवान बनवितें आणि नाजूक स्त्रिया बांध्यानें मजबूत व पाणीदार अशा करितें.

तरुण, मध्यम वयाचे, व ह्यातारे पुरुष व स्त्रिया यांस खात्रीचे गुणावह औषध म्हणजे क्लेमेंट टानिक असें आढळेल. शारीरिक मानसिक मनस्वी दगदग, दुःख, उघड्या हवेंत राहणे, गुप्तस्राव, छांदिष्टपणा यां पासून ज्यांना विकृति जडतात अथवा ज्यांनीं अज्ञानपणानें व खोडसाळपणानें प्रकृति बिघडून घेऊन स्वतांवर अनेक दुःखें ओढून घेतलीं त्या सर्वांस याचा गूण आला आहे. शरिर क्रमाक्रमानें थकत चाललें असतांना त्या ऱ्हासाचीं लक्षणें या औषधानें ताबडतोब नाहींतशीं होतात, आणि कमी कमी झालेल्या शक्ति पूर्वी प्रमाणें जोमदार होऊन प्रकृति निकोप होते. मुख्य मुख्य इंद्रियें कमताकत झालीं, मेंदू बिघडला, शरीराचे व मनाचे व्यापार कुंठले, विचारांचा घोटाळा झाला, ज्याचा त्याला भरंवसा वाटेनासा झाला, स्वभाव अनावर व शीघ्र कोपी झाला, उदासीनता व भित्रेपणा वाटला, गुडघे व पाठ थकली, छाती धडधडूं लागली, वातशूल झाला, कंबरेत सलका मारल्या तसेंच पाठींत दुखणें बेळेवेळ दात दुखणें अवयव तिडकणें झोंप नाहींशी होणें, कपाळ दुखणें पहाटेस थकवा येऊन अवयव दुखणें, मूत्रपिंड व मूत्राशय यांची आग होणें लघवी पांढरि होणें परमा व गुप्तस्राव यांनीं धातुपात होणें या व्याधि झाल्या अथवा स्त्रीपुरुषास आपल्या जन्मांतलीं कर्तव्यें व जबाबदाऱ्या बजावण्यास नालायक करणारा व त्यांच्या कामांत व्यत्यय आणणारा असा मानसिक व शारीरिक कोणताही आजार झाला तर या सर्वांवर क्लेमेंटचें टानिक हाच एक उत्तम उपाय ठरला आहे व ठरत आहे.

क्लेमेंटचें टानिक हें खरोखरीच मनुष्यमात्रास एक ईश्वरी देणगीच मिळालेली आहे हें घेतल्या बरोबरच आपला रोगनाशक अद्भुत प्रभाव दाखवूं लागतें. ह्याविषयीं घेणारांची साक्ष सर्वत्र व विश्वसनीय अशी आहे. ते ह्मणतात कीं, ह्याच्या प्रत्येक मात्रेनें गुण येऊं लागतो. हें ज्ञानतंतूची जबरदस्त शक्ति वाढविणारें टॅनिक असून हें शरीरांतील सर्व अवयवांना व स्नायूंना ज्ञान तंतू योगानें पूर्व स्थितीवर आणणारें शक्तिदायक सत्व पोहोंचवितें; इतकेंच नाहीं पण तीक्ष्ण रोग थकवा, मेहनत, अतिश्रम अथवा कित्येक कुकर्मांच्या योगें शरिरप्रकृति अशक्त झाली असली, किंवा जोंवर ज्ञानतंतूंची अशक्तता, साधारण किंवा स्थानिक अशक्तता चालूं असेल तोंवर कोणत्याही कारणानें अशक्तता आलेली असली तरी हें औषध घेतल्यावर गुण आल्यावांचून राहणार नाहीं. जोपर्यंत क्षीणता व ज्ञानतंतूची अशक्तता हींच रोगाचीं कारणें असतील तोंपर्यंत, क्लेमेंटचें टानिक हाच एक उत्तम उपाय आहे.

रोग्यांनीं लक्षांत ठेवावें कीं क्लेमेंटचें टानिक हेंच एक खात्रीचें औषध आहे, सर्व गांध्याकडे व बाजरांत तें विकत मिळतें F. Moor Clements.ही सही पेटीच्या बुडाशीं व वरच्या भागीं पाहून त्याची खात्री करून घेतांनां सावधागिरी ठेवावी, आणि जे नकली औषधें विकतात त्यांच्या पासून घेऊं नये. ' क्लेमेंटचें टानिक 'नांवानें शोध करा, आणि तेंच अस्सल औषध घ्या. हाड, मज्जा, व स्नायु ही यान बनतात, आणि रक्त व मेंदु यांना हें फार मानवतें. हें घेतल्यानें प्रकृति सदृढ, बळकट, ताकतदार, आणि जोमदार होते आणिं दुनियेंत या सारखी ईश्वरी देणगी दुसरी नाहीं.

इंडियांतील एजंट—कूप आणि को, ट्रेचर आणिको मुंबई, बालंटाईन को; स्मिथ, स्टानिस्ट्रिट को, बोनन को, कलकत्ता; डब्ल्यू इ. स्मीथ को, मद्रास; एन. एस. फरनानडो, कोलम्बो; आणि सर्व ठोकळ व किरकोळ गांध्याचीं दुकानं.

F. M. Clements, Inventor Sydney, Australia.



## अमोलिक संधि.

मॅट्रिक्युलेशन पास होऊन वकिलीचा अभ्यास पुरा झालेला इसम योग्य वेतन घेऊन मुक्त्यारी करण्यास तयार आहे. कायद्याच्या अज्ञानामुळें येणारे प्रसंग व कित्येक वेळां होणारा विनाकारण खर्च टळणार आहे तर व्यवहारी लोकांनीं ही संधी दवडूं नये. पत्रव्यवहाराचा पत्ता " वऱ्हाडसमाचार छापखान्यांत "क" यांस.


## नोटिस.

रा. रा. सोनभट बिन बापुभटजी जोशी राहणार मौजे बटवाडी बुद्रुख प्रगणें बाळापूर ता० बाळापूर जि० अकोलें शेवेशीं:—

बाळापुराहून केशव भट बीन अंबादास भट जोशी राहणार बाळापूर यांचा सा. न.वि. वि. मी तुह्मास अशी नोटीस आज तारखेस देतों कीं गंगा जान्हवी सयीबाई जवजे राघव भटजी राहणार बाळापूर इजकडून आह्मास रु० घेणें आहेत. ते खालीं लिहिल्या प्रमाणें.

रु० (९९)बरहूकूम छाप कागदावर ताबेगहाण खताचे रु० ९९ ता०१६ मार्च सन १८८७ इ० चा असून त्यांत ताबेगहाण जोशीपणाची वृत्ति मौजे तामशी मौजे पिंपळ गांव मौजे चिंचोली या तिन्ही गांवचा सदर्हू सयीबाईचा हिस्सा वे बाळापूर येथील ज्या सालीं सयीबाईचें साल येईल तें सदरहू रुपयांत जोशीपणाची वृत्ती आमचे जवळ ताबेगहाण असून आणि जोशीपणाचे वृत्तीचें उत्पन्न होईल तें व्याजांत वसूल घेण्याच्या शरती प्रमाणें आमची वहिवाट दस्तऐवजांत लिहिले प्रमाणें तारीखेपासून जारी आहे. हल्लीं नोटीस देण्याचें कारण असें कीं सदरील सईबाई ता०२६।१।९३इ० रोजीं मरण पावली याज करितां तुह्मी जवळचे ह्मणजे मैंताचे पुतणें आहात याजकरितां नोटीस पावल्या पासून एक महिन्याचे आंत आमचे रु० देणें आहेत ते द्यावे. देण्याचा रुपयाचा तपशील लिहिले प्रमाणें रु० (९९)चा दस्ता ऐवजाबद्दल रु.(१४८)मनीआडर पाठविली तिजबद्दल रु०(४८) अंजनगांवाहून बाळापुरास येण्याचे बैलगाडी भाडेबद्दल रु.(१०), मैंताचे मांदगीबद्दल रु० ( ११ ), गोदान व दक्षणा मिळून रु०( ७ ), मरणा बद्दल खर्च पहिले दिवशीं झाला तो रु. २४, मौजे पिंपळगांव तामसी आणि चिंचोली या तिन्हि गांवचे वृत्ती बद्दल सन१३०१ सन १३०२ फसली असे दोन सालाबद्दल तुमचे कडून घेणें आहेत ते.असे सर्व मिळून रु.१७०तुह्मापासून घेणें आहेत.याजकरितां नोटीशीनें कळविलें जातें कीं, नोटीस पावल्या पासून एक महिन्यांत सदरहू रुपये (१७०) व ह्या नोटीशीचा खर्च वगैरे सर्व आणुन देऊन पावती घ्यावी. असें झालें नाहींतर रितीप्रमाणें रु० वसूल करण्या करितां कोर्टांत फिर्याद करून अखेर निकाल होईपर्यंत कोर्ट खर्च वगैरे सर्व नुकसान भरून घेतलें जाईल ह्मणून दिली नोटिस सही ता० १४ माहे मार्च सन १८९३ इ०

( सही. )

केशव अंबादास जोशी दस्तुर खुद्द रहाणार बाळापूर.

## अर्थशास्त्र.

(१० वे अंकावरून पुढें)

श्रमाची उत्पादक शक्ती, कौशल्य, बुद्धि, नेमस्तपणा व खरेपणा यांनींही वाढते. कुशळ कारागीर, आपलें काम किती सफाईनें, थोड्या अवकाशांत व थोड्या खर्चांत करितो, व तेंच काम आडाण्याचे हातीं पडल्यास, किती नासधुस होते, वेळ मोडतो व खर्च वाढतो; याचा विचार केला असतां कौशल्याची योग्यता तेव्हांच समजून येते. आतां हें कौशल्य येण्यास, कामांत पुष्कळ दिवस वहिवाटावे लागतें, ह्मणून पहिल्या पहिल्यानें कारागिरास चांगली मजुरी मिळत नाहीं. असो.

बुद्धिहीन मनुष्य आपलें काम यंत्राप्रमाणें करितो, ह्मणजे तो जेवढें शिकला आहे तेवढेंच त्याला येत असते. बुद्धी खर्च करून, कांहीं सुधारणा सुचविण्याची त्याला शक्ती नसते. तोंच बुद्धिवान मनुष्य एखादें काम तेव्हांच उचलतो, व शहाणपणानें करितो. त्यामुळें त्याचे हातानें, पूर्वीचे मजूरापेक्षां जास्त काम होतें. एवढ्या करितां मजूर लोकांस शिक्षण दिल्यानें, अतीशय फायदा आहे हें सांगण्याची आवश्यकता नाहीं.

नेमस्तपणानेंही, श्रमाची उत्पादक शक्ती वाढण्यास मोठी मदत होते. नेमस्तपणाचे अभावानें शक्ति क्षीण होते. दारूखोरास तो शुद्धीवर असतांही मेहनतीचीं कामें करवत नाहींत, व्यसनी लोक अकालीं निःशक्त व मरणाधीन होतात. ह्मणून अर्थांत अशा लोकांकडून जितकें काम होण्याचा संभव आहे त्या पेक्षां पुष्कळ काम बेतबातानें वागणाऱ्या लोकांकडून होतें, हें सांगणें नलगे. मजुरांचा नेमस्तपणा व बुद्धी यांचा परस्पर फार निकट संबंध आहे. बुद्धिहीन मनुष्यास, ज्यांत बुद्धीची जरूरी आहे अशा गोष्टी पासून आनंद होऊं शकत नाहीं. किंवा त्यास निरुपद्रवी मौजा पासून काय सुख आहे हें समजत नाहीं. त्यामुळें त्याचें लक्ष व्यसनाकडे साहजिक जातें. एवढ्या करितां अर्थशास्त्र दृष्ट्या लोकांत शिक्षणांचा प्रसार करणें मोठें महत्वाचे आहे. शिक्षणानें बुद्धीचा विकास होतो, व ज्याचा त्यास आपला धंदा अधीक हुशारीनें करितां येतो. तसेंच शिक्षणानें सुखाचे व विश्रांतीचे नवीन मार्ग खुले होऊन, केवळ व्यसना पासूनच करमणूक किंवा सुखोत्पत्ती करून घेण्याची त्याला अवश्यकता रहात नाहीं. त्यामुळें नेमस्तपणा साहजिकच अंगीं येतो. इग्लंडांत शिक्षणसंबंधीं कायदा१८७० मध्यें चालूं झाल्या पासून गुन्ह्यांचें मान सवाईनें कमी झालें आहे, व दारूचा खप कमी होऊन, दारूवरच्या जकाती पासून जें उत्पन्न होतें, तें पांच कोट रुपयांनीं कमी झालें आहे.

मजूरदार जर लबाड असेल, तर तो आपलें काम बरोबर करितो किंवा नाहीं, हें पहाण्यास दुसरा मनुष्य लागतो. तोच जर मजूर विश्वासुक असेल, तर देखरेखीची आवश्यकता न राहून तिजबद्दलचा खर्च दुसरीकडे करण्यास सांपडतो. दुसरें, देखरेख किती जरी केली तरी लबाड मजूर खेळण्यास सोडीत नाहींत व कांहीं कामांत तर देखरेख करितांच येत नाहीं. ह्मणून मनुष्यांनीं इमान सोडिलें तर

त्यांत देशांचें मोठें नुकसान होतें ही गोष्ट सहज समजेल.

वरील विवेचनावरून हें लक्षांत आलेंच असेल कीं, श्रमाची उत्पादक शक्ति वाढण्याचीं कारणें, श्रमविभाग, संयुक्त श्रम, हत्यारें व यंत्रें यांचा उपयोग, कौशल्य, बुद्धि, नेमस्तपणा व विश्वासुकपणा ही होत. श्रम करणारांत जसे उत्पादक व अनुत्पादक असतात तसे संपत्ति खाऊन किंवा वापरून ऱ्हास करणारांतही उत्पादक व अनुत्पादक असतात ह्मणून आतां ह्या गोष्टींचा विचार करूं.

उत्पादक आणि अनुत्पादक श्रमांचा विचार केला ह्मणजे असें लक्षांत येईल कीं उत्पादक श्रम करणारा मजूर हा, संपत्तीचा उत्पादकच ऱ्हास करणारा आहे. आणि अनुत्पादक श्रम करणारा मजूर हा, संपत्तीचा अनुत्पादक ऱ्हास करणारा आहे. तरी उत्पादक श्रम करणारा मजूर, जेवढें ह्मणून खातो किंवा वापरून नाहींसें करितो. तेवढें सारेंच उत्पादक असतें असें नाहीं. तर तसे श्रम करीत असतांना, त्याच्या निर्वाहास जेवढें अवश्य आहे तेवढेंच उत्पादक होऊं शकतें, बाकीचे सर्व ह्मणजे चैनीचे किंवा ऐषआरामाचे पदार्थ जे तो खातो किंवा वापरतो, ते उत्पादक होऊं शकत नाहींत. कारण त्यापासून पुढें नवीन संपत्ति उत्पन्न करण्यास मदत होत नाहीं. सर्व प्रकारची नासधूस ही ही अनुत्पादकच आहे. कांहीं लोकांचा असा समज आहे कीं, उत्पन्न केलेले पदार्थ जितके लौकर खाऊन, किंवा वापरून, नाहींतसे होतील तितके चांगलें. कारण ते पुन्हा तयार करण्यास मजुरांस काम मिळून व्यापारास तेजी येते. परंतु ही भ्रांति आहे. कारण तसें जर असेल तर देश संपन्न करण्याचा सुलभ उपाय ह्मटला ह्मणजे देशांतील घरेंदारें देवालयें, कारखाने वगैरे ताबडतोब जाळून टाकावे, आगगाडीच्या रस्त्याचा नास करावा, तारायंत्रें मोडून तोडून टाकावीं ह्मणजे झालें! ! आतां वर सांगितलेल्या पदार्थांची अशा रितीनें जर आपण व्यवस्था लाविली तर ते पुन्हा नवीन करण्याचे कामास मोठी तेजी येईल, यांत कांहीं संशय नाहीं. परंतु हा जो फायदा होणार तो समाजाच्या एकंदर नुकसानी पासून होणार, ही गोष्ट विसरतां कामा नये. ह्मणून नासधुस किंवा उधळेपणा यानें व्यापारास तेजी येते व देशाची भरभराट होते, हें ह्मणणें अगदीं वेडगळपणाचें आहे असें स्पष्ट होतें.

वऱ्हाडसमाचार

मिती चैत्र शुद्ध २ शके १८१५

सन १८९२ च्या सुधारलेल्या कायदे कौसिलच्या कायद्या अन्वयें तीन हक्क मिळाले आहेत. वार्षिक बजेटा संबंधानें वादविवाद करण्यास परवानगी मिळाल्या प्रमाणें तें येत्या गुरुवारीं कायदे कौंसिलदारा समोर मांडलें जाणार आहे. ही पहिली गोष्ट होय राज्य कारभाराच्या माहिती साठीं प्रश्न विचारण्याचा अधिकार संप्राप्त झाल्या पासून त्याचा उपयोग उत्तम व हितावह होत आहे. हा दुसरा प्रकार मोठा संतोष कारक आहे. तिसरा लाभ म्हणजे कायदे कौंसिलदारांची संख्या वाढविणें हा होता. या बाबतींत कांहीं लढा पडला होता परंतु त्या संबंधाचे नियम स्टेट सेक्रेटरी कडून इंडियन सरकाराकडे नुकतेच आले आहेत तेव्हां ते बाहेर पडण्या विषयीं मोठी उत्कंठा व जिज्ञासा उत्पन्न झाली आहे.

नामदार पाली चेंतसालराव पांटलू सी. आय. इ. यांनीं जे तीन प्रश्न विचारले आणि त्यांजवर जीं उत्तरें देण्यांत आलीं तीं फार लक्ष लावून वाचण्या सारखीं आहेत. प्रश्न पहिला असा कीं गेल्या बारा वर्षांत शिलक रु० १,१३,३९,००० राहिली त्या पैकीं गेल्या चार वर्षांत तूट पडलेली रक्कम रुपये ५२९७००० वजा जाता बाकीची नक्की शिलक ६०,४२००० रुपये राहिले त्याचां खर्च कसा काय करण्यांत आला आणि त्या पैकीं किती रुपये १८९२–९३ अखेरीस रोख जमेंत आहेत. या प्रश्नावर सर डेव्हिड बारबर इंडियाचे फडणीस जबाब देतात कीं या शिलकेचा उपयोग प्रत्यक्ष रेलवे, कालवे, मुनसिपालिट्या, शेतकी वगैरे साठीं झाला नाहीं तरी या लोकोपयोगीं कामा करितां जो कर्जाऊ पैसा काढिला तो शिलकेच्या मानानें कमी काढला गेला आणि गेल्या वर्षाच्या हिशोबांत किती रक्कम त्या मोठ्या शिलकेपैकी जमा आहे हें कांहीं सांगतां येण्या सारखें नाहीं. दुसरा प्रश्न युरोपियन आफिसरा संबंधानें होता कीं २०० रुपये पगार पासून ३००० रु. पगार व त्याहून वरचे पगार यांवर लष्करी लोक खेरीज करून किती जण किती पगारावर प्रांता प्रांतातून आहेत याची माहिती पुरवावी. याच्या जबाबाचा हवाला दुसऱ्या एका पार्लमेंटरी कागदावर सोंपविला आहे. परंतु ही सविस्तर माहिती त्या कागदा वरून लोकांच्या उपयोगा साठीं प्रसिद्ध झाली पाहिजे. तिजवरून अनेक गोष्टी आंग्लो–इंडियनांस कळविण्या सारख्या आहेत.

शेतकरी लोकांस तगाईचा जो पैसा देतात त्याच्या विषयी तिसरा प्रश्न होता. गेल्या पांच वर्षांत किती रकमा शेतकऱ्यांस कर्जाऊ मिळाल्या व त्या पैकीं किती न येत्या कर्जांत बुडाल्या आणि तगाईच्या कायद्याचा सार्वत्रिक व पुष्कळ लाभ कां घेतला जात नाहीं असा महत्वाचा प्रश्न होता. यावरील जबाब चांगला समर्पक होता. सर फिलिप हचिन्स बोलले कीं, १८९१—९२ सालीं २०½ लक्ष रुपये कर्ज शेतकऱ्यांस देण्यांत आले. ही रक्कम १८८३ चा आक्ट व १८८४ चा आक्ट या दोहों खालीं मिळून आहे. अडाणी कुणब्यास हे सरकारी पेढीचे कायदेकानू व त्यांची मातबरी हीं कळण्यास फार काळ लागतो. शिवाय ही तगाईची रक्कम पूर्वींच प्रांताच्या मानानें मुक्रर केलेली असते त्यामुळें जास्ती कर्ज देण्यास ही सवड नसते. आतां हें खरें कीं, पूर्वींच नियम सुधरून सरकारा पासून कर्ज घेतल्यास विशेष सोपी व सवडी दिल्या आहेत तरी ज्या जमीनजुमल्याच्या आधारावर कर्ज द्यावयाचे त्याजविषयीं स्थानिक सरकाराला कसोशीनें काळजी घ्यावी लागते व त्या चौकशी मुळें शेतकऱ्यास पुष्कळ त्रास होतो या खेरीज तगाईचा कायदा चांगला फलदायक न होण्यास निराळें कारण असें हो आहे कीं, गांवांतील सावकाराशीं शेतकऱ्याची देवघेव झालेली असते व सावकार सरकाराप्रमाणें कडक नसतो. तो अनेक वेळां ढिलाई दाखवितो आणि तगाईच्या स्वरूपा शिवाय अन्य स्वरूपाचें कर्ज ही तो कुळाला देतो. यामुळें शेतकऱ्यास सरकारापेक्षां सावकारच बरा वाटतो. शिवाय सरकाराच्या ऋणकोस सावकार चहात नाहीं इतकेंच नाहीं तर तो त्याचा धनकोही होऊं इच्छित नाहीं. शेतकऱ्यासाठीं पेढी स्थापण्याच्या विचाराला अडथळे व हरकती अनेक आहेत आणि तशा पेढ्या घातल्यास एक निराळे भारी खर्चाचें खातेंच ठेवावें लागेल असें सर हेचिन्स ह्मणाले. हा शेवटील आक्षेप ह्मणजे निव्वळ टाळाटाळीचा आहे आणि त्या बद्दल रावबहदूर महादेव गोविंद रानडे यांनीं १८९१ सालीं औद्योगिक परिषदे पुढें योग्य तजवीज सुचविली आहे व त्या प्रकरणांत बहूत खल ही झाला आहे तेव्हां विशेष आह्मी लिहूं इच्छित नाहीं.

नामदार दादाभाई नवरोजी पार्लमेंटात सभासद झाले तेव्हां पासून ते हिंदुस्थानाविषयीं अविश्रान्त खटपट करीत आहेत. त्यांचे प्रौढ विचार, रसाळवाणी व गंभीर स्वभाव या तीन गोष्टीमुळें त्यांच्या ह्मणण्यास बहुतेक लोक मान देतात. त्यांनीं सिव्हिल सर्व्हिस परीक्षेसंबंधानें एक कायद्याचा मसुदा आणिला आहे त्यांत त्यांचे मागणें कीं सिव्हिल सर्व्हिसची परीक्षा एकाच वेळीं विलायतेस व इंडियांत झाली पाहिजे. हा खर्डा पुढें आणण्यांत त्यांचा मतलब असा कीं विलायतेसच परीक्षा होत असल्यानें बहुतेक मोठमोठ्या पगाराच्या व अधिकाराच्या जागा मध्यम स्थितींतले इंग्लिश लोक मिळवूं शकतात आणि त्या पासून नेटीवांची चोंहीकडून बुडवणूक होत आहे. सिव्हील सर्व्हिसचा बहुतेक मक्ताच इंग्लिशांनीं घेतल्या सारखा आहे आणि ते नोकरीचीं वर्षे पुरीं होऊन विलायतेस गेले ह्मणजे त्यांच्या बरोबर त्यांचा अनुभव, माहिती, व वाकबगारपणा जातो इतकेंच नाहीं तर पेनशनांच्या रूपानें ते या देशाचा पैसा लांबवितात. महाराणी सरकार जाहिरनाम्यांत कळवितात कीं इंडियांतील प्रजेला धर्म देश, व आचारविचार यांच्या भेदामुळें इंग्लिश प्रजेहून निराळ्या परकीयपणानें वागविलें जाणार नाहीं आणि खरोखर स्थिती पाहावी तर या परीक्षे संबंधानें नेटीवांच्या योग्य हक्काला जुमानावयाचें नाहीं. जेणेंकरून त्यांच्या मार्गांत विघ्नें येतील तितकें आमच्या राज्यकर्त्यांचें बरें! लार्ड लिटन देखील ह्मणत होते कीं विलायतेस परीक्षा भरविण्याची शक्कल नेटीवांच्या डोळ्यांत धूळ टाकण्या सारखी आहे आणि नेटीवांशीं राज्यकर्त्यांचें हें आपमतलबाचें व गैरवाजवी असहर्तन आहे. १८८६ च्या कमिशननें आपल्या रिपोर्टांत या प्रश्नाचा फार्स करून दाखविला आहे. त्यांचें ह्मणणें कीं उत्तम प्रतीचें इंग्रजी शिक्षण इंडियांत मिळणार नाहीं तेव्हां अभ्यास व परीक्षा विलायतेसच झाली पाहिजे. खरा हेतु असा कीं गोऱ्या लोकांसाठीं हें सिव्हिल सर्व्हिसचें राखलेलें कुरण आहे तेव्हां त्याच्या असमंतांत नेटीवांचा शिरकाव होता कामा नये. लार्ड क्रास साहेबांनीं स्टेट सेक्रेटरी या नात्यानें कमिशनच्या ह्मणण्याला आनंदानें मान डोलविली. स्वार्थपटु, कृपण व मत्सरी राज्यकर्ते शेट दादाभाई यांचा मसूदा पसार होऊं देतील असा आह्मास त्यांच्या मागील वर्तनावरून भरंवसा येत नाहीं. आणि निदान ते आयर्लंड, वेल्स, स्काटलंड वगैरे देशाच्या प्रकरणांच्या बाहुल्यांत हा खर्डा गमवून लांबणीवर टाकतील असें तर आह्मी आरंभापासून जाणून आहों. प्रत्यक्ष स्वकीय व बंधु ह्मटलेल्या आयरिश लोकांची काय तारंबळ उडत आहे हें आपण पाहतों तेव्हां इंग्लिशांनीं इंडिया विषयीं अनास्था, स्वच्छंदीपणा व उदासपणा दाखविला तर त्यांत त्यांच्या नैसर्गिक स्वभाला ते विसरले असें कोणी ही म्हणणार नाहीं. असो, आपला दृढ भाव तर हा कीं प्रयत्नअंतीं परमेश्वर!

The Berar Samachar

MONDAY MARCH,
20 1893.

## MR. AITKEN ONCE MORE

In our issue of the last week we have announced with pleasure the appointment of Mr. Aitken to the office of the Director of Public Instructions in the absence of our most revered and worthy Rao Bahadur Jatar proceeding on three months' leave since the 28th. instant. We need not say that the appointment has evoked general satisfaction. The probable candidates for the post were two—one far junior and able too and the other on the contrary far senior in length of service and more qualified by a peculiar life of sacrifices to the cause of higher education in this province. Berar is making rapid strides in education and the present satisfactory condition of the High schools is more or less solely due to the vigorous discipline of Mr. Aitken. Apart from literary accomplishments, strength of character is a power. It is a power of the highest kind. In an educational officer judgment and character are the first essential requisites. For that cold rigid justice turning neither to the right nor to the left; for an unfluching steadiness undaunted by any reverses getting mastery over a desire to change or wish for change a place where merit was neglected more than once and persecuted by party-intrigues for several years, for that unostentatious simplicity tempered with silent interest and unassuming exclusive sprit able at once to penetrate the veil and appreciate the inward recesses-no matter however trifling—the distinctive characteristics of Mr. Aitken no less if not more conspicuous in our esteemed Rao Bahadur, we know not where else to look.

A long residence of 26 years under a tropical sun in a tropical country solely devoted to the building up of the mind and character of the backward youth must have been a trying work to a man of Mr. Aitken's temperament. Any other department would have reared him to fair preferments. Mr. Jacob and Kirkham juniors in the Bombay educational departments with as much status as Mr. Aitken has, have rises to the maximum of the 3 rd and 2 nd grades viz to Rs 1000 and 1250 respectively. Even a change of department would have bettered h

pecuniary conditions. Mr. Aitken is a familiar name in the hearts of all true Berari students. Among students popular he is and among those servants of the educational department who understand what it is to work honestly and who are able to understand his heart and head. The lines.

'Nor e'er had changed nor wished to change his place' in Gold-Smith's Deserted Village will for at least two score years identify Gold-Smith's village school-master with our Berar Head-Master.

our paper has all Hindu sympathies and we would not certainly like to see what is reserved for a Hindu misappropriated by a European. But for the sake of that mad privilege we would be far from well disposed towards seeing a man who has done and suffered so much, set aside and ignored to the interest of a selfish and and ungenerous privilege.

In point of remuneration there is or rather there will soon be a senior to Mr. Aitken. But the minimum of the post is Rs.250 rising by a biennial increment of Rs.50 to Rs.500. If the incumbent of that place were regarded the rightful claimant to the Directorship then Mr. Elliot ought to have been the Director before Rao Bahadur N. B. Dandekar. It would have been deemed very hard of Mr. Aitken's authorities if they had removed Mr. Aitken from the more honorable and more useful work of a Head Master to the more laborious and more searching work of a *forwarding* Inspector. They would have ignored talents and Mr. Aitken would have ruined his utility. We are therefore glad that Mr. Aitken's claims have been and are being considered.

Rao Bahadur Jatar no doubt superseded Mr. Aitken; but it was on account of his being an able and vigorous Native. Eight years have further domiciled Mr. Aitken in India and it would be hard and cruel to set aside a life of sacrifice guilty of nothing but of being a European. We would give truce to the subject at present offering tribute to an other gentleman as the next candidate for the highest educational place requiring the utmost of a man's abilities and judgment. We need not say we allude to Mr. Vishnu Moreshwar Mahajani. *M. A.*

## वऱ्हाड

मि. एफ. एस. बुलक जुडिशिअल कमिशनर हे गेल्या १५ तारखे पासून ७ महिन्यांच्या फर्लो रजेवर विलायतेस गेले.

आणि या रजेंत बुलढाण्याचे डेपुटी कमिशनर कर्नल स्पानस्की यांस आफि० जुडिशिअल कमिशनर नेमून त्यांच्या जागीं उमरावतीचे डेपुटी कमिशनर कर्नल गनथार्प यांस बुलढाण्यास बदलले.

हल्लीं असिस्टंट सिव्हिल व सेशन जज्जचें काम पहात असलेले मि. निकोलेट हे उमरावतीस आपल्या डेपुटी कमिशनरचें कामावर परत रुजूं झाले.

राव बहादूर श्रीराम भिकाजी जठार बी. ए. शाळा खात्याचे डायरेक्टर तारीख २८ मार्च मंगळवार पासून तीन महिन्यांच्या हक्काच्या रजेवर जात आहेत.

खान बहादूर शमसुद्दीन अल्लीखान असि. कमिशनर आकोला यांस इलिचपुरास बदलले व त्यांचे जागीं रा. रा. विश्वनाथ नारायण दांडेकर एक्स्ट्रा असि. कमिशनर यांजकडेस पूर्वी प्रमाणें स्पेशल असि. कमिशनरचें काम दिलें.

आकोला ट्रेझरी आफिसरचे जागीं मि. इ. मार्शल यांस मेहकराहून आणिलें आहे.

आणि मि. रुस्तुमजी फरिदुमजी असि. कमिशनर यांस मलकापूराहून बुलढाण्यास बदलले व त्यांचे जागीं मि. शापूरजी वीरजी एक्स्ट्रा असि. कमिशनर, वाशिम यांस मलकापुरास नेमलें.

रा. रा. वामन नारायण बापट ए० अ० क० उमरावती यांच्या एक वर्षाच्या रजेंत कुमार श्री हरबानजी रावजी एल्. एम्. असि. क० यवतमाळ यास उमरावतीस बदलले.

मि. सी. एच प्राइस ए० अ० कमिशनर यवतमाळ यांस वाशिमास बदलले.

मि. अॅग्रेडी ए० अ० कमिशनर हे रजेवरून परत आल्या नंतर बडनेरा स्मालकाज कोर्टाचा चार्ज घेतील व तेथील जज्ज मि. मुबारकअल्ली एक्स्ट्रा असि. कमिशनर हे त्यांचे पूर्वीच जागीं मोर्शीस जातील.

यावरील नेमणुका व बदल्या यांच्या गडबडींत आमचे मागमलेले तहशिलदार रा. रा. नारायण पांडुरंग जोशी यांस यवतमाळासच एक्स्ट्रा असि. कमिशनर नेमले व रा. रा. कृष्णाजी हरी तहशीलदार उमरावती यांस बुलढाण्यास एक्स्ट्रा असि. कमिशनर नेमलें हें कळविण्यास फार आनंद वाटतो. आणि वरील रिकाम्या झालेल्या दोन तहशीलदारांच्या जागीं हुषार, व होतकरू हक्कदार यांसच वरिष्ठ अधिकारी नेमतील अशा आम्हास फार आशा आहे.

रा. रा. एकनाथ मोरेश्वर कान्हेरे आफि० ए० असि० कमिशनर यांनीं पेनशन घेतलें आणि वृद्धापकाळीं ते वाई क्षेत्रीं जाऊन राहणार आहेत असें कळतें. वऱ्हाडांतील हे जुने अधिकारी असून ते आपल्या कामांत मोठे दक्ष, चतूर व बाणेदार असत. परमेश्वर त्यांस दीर्घायु व सुखी करो!

मि. सफदर अली ए० असि. केळापूर यांस मेहकरास बदलून रा. रा. अंबादास संतो ए० असि० कमिशनर यांस वाशिमाहून केळापुरास बदलले असें समजतें.

## जाहिरात.

सर्वत्र लोकांस कळविण्यांत येते कीं, शहर इलिचपूर येथील म्यु० कमेटी करितां पगारी सेक्रेटरीची जागा मंजूर झाली आहे. सदरहू जागे करितां उमेदवार पाहिजेत.

उमेदवार हा म्याट्रिक्युलेशनची परिक्षा पास असून शिवाय एंजिनियरिंग कॉलेजांतील एफ. सी. इ.ची परिक्षा पास असला पाहिजे. किंवा त्या वर्गांत निदान एक वर्षापेक्षां जास्त दिवस शिकलेला असला पाहिजे. पगार दरमहा ४० रुपये प्रमाणें देण्यांत येईल. उमेदवारांनीं आपले अर्ज तारीख १५ माहे एप्रिल सन १८९३ इसवीचे आंत सेक्रेटरी म्यु. कमेटी शहर इलिचपूर यांजकडेस लेखी पाठवावे. अर्जासोबत विद्येचे बद्दल कोठें काम केलें असल्यास त्या बद्दल आणि वर्तणुकी बद्दल सर्टिफिकिटें पाठवावीं. जास्त माहिती पाहिजे असल्यास म्यु. कमेटीचे आफिसांत मिळेल. कळावें तारीख १५ माहे मार्च सन १८९३ इसवी.

GirRao Ramchandra.
व्हाइस चेअरमन म्यु. क.
शहर एलिचपूर.

## ADVERTISEMENT.

The following rules for payment of fees for Medical attendance and Medicine at the Dispensaries at Ballapur, Akot, Jalgaon, Shegaon and Telhara are hereby published for general information the *Resident* having sanctioned their extension to these Dispensaries as a tentative measure.

(Signed) J. G. Morris
Deputy Commissioner
Akola District.

RULES

1 Persons whose annual income is less than Rs 300 per annum and all Government servants are alone entitled to gratuitous relief at a dispensary which is wholly or in part maintained at the expense of Government.

2 Any person whose annual income is Rs 300 or over and is less than Rs 1,000 will get a ticket entitling him to relief (for self and dependents) on payment of two rupees annually in advance.

3 Any person whose annual income is Rs. 1,000 and is less than Rs 5,000 will get a ticket similarly on payment of Rs. 6 annually in advance.

4 Any person whose annual in come is Rs. 5,000 or over will get a ticket similarly on payment of Rs. 15 annually in advance.

5 Any person who presents a dispensary with a donation of not less than Rs. 100 and not exceeding Rs. 200 shall get a ticket entitling him to relief for self and dependents for ten years.

Any person who presents a dispensary with a donation of Rs. 200 or over shall get a ticket entitling him and his dependents to medical relief for his life.

6 A person who is not entitled under rule 1 to gratuitous relief and who has not made payment required by rules 2,3 or 4 or who has not presented a donation under rule. 5 must pay for any medicine dispensed to him at a dispensary such price as may be fixed from time to time by the Sanitary Commissioner. A list of the prices fixed by the Sanitary Commissioner will be hung up in every dispensary.

7. The local body entrusted with the management of a dispensary will prepare a list of persons not entitled to gratuitous relief under rule (1). the assessment of incomes prepared for the Town Fund being accepted for this purpose. A copy of this list will be furnished to the medical officer in charge, and it will be his duty to refuse gratuitous treatment or the gratuitous supply of medicine to any one not entitled to them under these rules.

8. Tickets will be issued under the orders of the local body concerned. The period for which a ticket is current and the names of the persons entitled to relief under it will be specified on it.

9. The local body concerned is responsible that all payments and subscriptions are collected and brought to account.

10. Holders of tickets will not ordinarily be entitled to treatment except on attendance personally at the dispensary, but the medical officer in charge may use his discretion as to cases in which he considers it necessary to relax this rule.

11. Any person who is attended beyond the limits of the village in which the dispensary is situated shall pay Rs. 2 for each visit and 2 annas per mile for the distance travelled, unless a suitable conveyance is provided to and from the patient's house and 3 annas for medicines. The medical officer not to be required to travel more than 10 miles unless there is railway communication, when his fare according to the scale laid down by Government for the travelling of officers of his class shall be paid in addition to the fee and charge for medicines. For attendance at the patient's house in the same town or village as the dispensary the fee of Rs. 2 only to be charged.

12. Fees for attendance on patients away from dispensaries to be the property of the officer in charge of the dispensary. Fees for attendance on patients at the dispensary and all charges for medicines to be credited to the Dispensary Fund and to Government in the same proportions as the Local or Municipal Board and Government contribute to the dispensary.

13 Fees for visits between sunset and sunrise to be double the above rates and to be the property of the Medical officer.

14 Where the Medical Officer is an Assistant Surgeon or an Apothecary he shall be entitled to recive double the above fee.

15 These rules do not apply to any dispensary the whole expense of which is defrayd from Municipal funds or from a charitable endow ment.

## अकोला बाजारभाव

हुंडी मुंबईची दर्शनी.... .... .... ९९।।।=
" १५ दिवसांच्या मुदतीची.... ९९।।=
सुवर्ण २६।। .... .... रुपें ....१०८।।
मीठ....३।।। .... आळशी मापी १०९
जवस वजनी १०९।।.... चणे ७२।।
गहूं काठे............ ८५ बनशी ....९०
साखर.... ३।।....कराळे.... .... ४।=
उडीद....३।.... .... मुग २।।।
जवारी ५५....५७।। ....सर्की....५८–
तूप.... ९ ................ तेल ६।।।=
कापूस....४५–५६............रुई ७६–७८

सऱ्याचे भाव (इंग्रजी)

गहू वैशाख शुद्ध १९४९ ....... ६६।।।
आळशी चैत्र "......."........ ११०
रुई फाल्गुन.........."....... ०
सर्की वैशाख नवे सालची"..........५।
जवारी.... वसंत........"........... ०

## वर्तमानसार.

सिलोनचे चीफ जस्टिस यांचे दहा वर्षांचा अनुभव घेऊन असें मत झालें आहे कीं, ज्युरीची पद्धति चांगली.

लखनौ येथें एक 'पोलिस ट्रेनिंग स्कूल' स्थापन करण्याचा विचार आहे.

इंग्लंडांत जास्त सैन्य ठेवण्याचा विचार आहे असें ह्मणतात.

किवेक येथील धबधबा गोठून गेला आहे. अशी स्थिति आजपर्यंत कधीं झाली नव्हती.

खोतीच्या जमिनीतील झाडांवर मालकी खोतांची असा हाय कोर्टानें एका खटल्यांत निकाल दिला. आनंदाची बातमी आहे.

सुमात्रा बेटांतील हत्ती वाघाच्या भितीनें रात्रीं नदींत निजतात. क. णू.

प्यारिस येथें फ्रान्सच्या ब्यांकेच्या ऑफिसांत जेथें खजीनदार बसतो त्याचे पाठीमागे एक अदृश्य स्थल आहे. त्या स्थलांत गुप्त रीतीनें फोटोग्राफ घेण्याची व्यवस्था केलेली असते. खजिनदाराला ज्या मनुष्याविषयीं कांहीं संशय येईल त्या मनुष्याचा तेथल्या तेथें तावडतोब फोटो घेण्यांत येतो. दी. बं.

माजिस्ट्रेटची कान उघाडणी— शिकंदराबाद एथील रेलवे कडील एका गोऱ्या असिस्टंट सुपिरेंटेंडेंट साहेबांकडे एका टांगेवाल्याचे भाड्याचे पैसे यावयाचे होते तेव्हां तो साहेबांचे बंगाल्यावर पैसे मागण्या करितां गेला तर त्याला साहेबांनीं पैसे न देतां पैशाबद्दल दिवाणींत फिर्याद करण्याला सांगून पोलीस शिपाया कडून त्याला बंगल्यातून धक्का मारून बाहेर घालविलें. त्या वरून त्या टांगेवाल्यानें साहेबांवर फौजदारींत फिर्याद केली. त्याची चौकशी तेथील क्यान्टोन्मेंट माजिस्ट्रेट साहेबांनीं करून आरोपी साहेबांनां चार आणे दंड केला. हा खटला हायकोर्टापुढें आला तेव्हां हायकोर्ट ह्मणतें कीं, माजिस्ट्रेटनें या खटल्यांत आरोपिला अगदीं अयोग्य शिक्षा दिली. भाड्या करितां कोर्टाची वाट दाखविली ती गोष्ट वेगळी, पण त्याला धक्के मारून घालविण्याचें कारण नव्हतें. पोलीस साहेबां सारख्या मोठ्या अधिकाऱ्यानीं असें करणें अनुचित होय. तेव्हां अर्थात पुन्हा करूं नये अशासाठीं साहेबानां माजिस्ट्रेटनें योग्य दंड करणें अवश्य होतें. आमची नेटिव्ह ज्युरी पक्षपात करते आणि गोरे न्यायाधीश मात्र न्याय देतात!!

कोणी सरकारी नोकरानें राजीनामा द्यावयाचा तो अट्टीवर कधीं देऊं नये, आणि तसा अट्टीवर दिलेल्या राजीनामा मंजूर करूं नये असें सरकारानें ठरविलें आहे. अट्टीवर ह्मणजे कित्येक कामदार आपल्या भावाला, मुलाला किंवा अन्य कोणाला नोकरी दिली तर आपण काम सोडण्याला तयार आहों ह्मणतात. ही सबब कुचकामाची आहे असें सरकारचें ह्मणणें आहे तर, इकडे कामदारांनीं लक्ष द्यावें. धा० वृ०

देवी न येण्या करितां जसा टोचण्याचा प्रयोग सुरूं झाला आहे तसा कालरा न होण्या करितां टोंचण्याचा प्रयोग सूरूं करावा असें कित्येक डाक्टरांचें मत आहे.

हिंदुबॉल— युरोपियन लोक आपापल्या बायका घेऊन नाचतात तसें आपण करावें असें एका नेटिव संस्थानिकाच्या मनांत येऊन त्यानें चांगल्या बायका जमविण्याचें सुरूं केलें असें समजतें. हे संस्थानिक कोण?

मि. एडवर्डकटर नांवाचे अमेरिकेंतील न्युयार्क शहरांतील एक गृहस्थ सध्या हिंदुस्थानांत आले असून त्यांची कलकत्ता येथें हिंदुधर्मावर व्याख्यानें झालीं. सर्व धर्मांत अति श्रेष्ठ अगदीं खरा आणि विचारसरणीस पूर्णपणें धरून असणारा असा काय तो हिंदुधर्म आहे असें त्यांनीं हिंदु धर्मा विषयीं आपलें मत दिलें. ख्रिस्तीधर्मपुस्तकानें त्यांचे मनास शांति मिळेना. आपणास कोणताही धर्म नाहीं असें त्यास वाटावयास लागलें. परंतु पुढें संस्कृत ग्रंथाकडे त्यांचें चित्त वेधून सध्यां हे गृहस्थ आर्य धर्माचे बनले आहेत. त्या प्रमाणेंच शामर्ण्य देशींचे एका विश्वविद्यालयांतील तत्वशास्त्राचे मुख्याध्यापक पंडित ड्यूसन ह्यांचे मुंबई येथें रायल एशियाटिक सोसायटी पुढें 'अद्वैतमीमांसा' या विषयावर विद्वतापचूर असें भाषण झालें. जर्मन लोकांच्या संस्कृत विद्येच्या व्यासंगावरून लवकरच ते लोक ब्राह्मण बनतील व यज्ञयागादी कर्मे करण्याचें ज्ञान भ्रष्टबुद्धि होत असलेल्या एतद्देशीय ब्राह्मणांस त्या पासून करून घेण्याची पाळी न येवो ह्मणजे झालें? लोकांस आमचें तत्व शास्त्र श्रेष्ठ वाटावे, आमचा धर्म खरा व अत्यंत हितकर वाटावा व आह्मी धर्मभ्रष्ट होऊन स्वेच्छाचारी बनावें हें देशाचें दुर्भाग्य नव्हे काय! न्या. सिं.

हिंदुस्थानच्या कोणत्या भागांत कोणते खनिज पदार्थ आहेत, त्यांच्या खाणी कशा काढतां येतील ह्या संबंधानें पाहणी करण्याकरितां हिंदुस्थानच्या स्टेट सेक्रेटरींनीं एका मनुष्याची नेमणूक थेट विलायतेहून केली आहे. प्रथम बंगाल इलाख्याची पाहणी करून नंतर इतर इलाख्यांची करावी असा तुर्त बेत ठरलेला आहे. हिंदुस्थानचें कधीं काळीं जर कल्याण व्हावयाचें असेल तर तें खाणींच्या-कारखान्यांच्या वृद्धी पासून खचित होईल. हिंदुस्थानच्या लोकांच्या वापरास ज्या जिनसा लागतात, व ज्यांचा परदेशांतून हिंदुस्थानांत लोट वाहत आहे, त्या जिनसा हिंदुस्थानांतल्या हिंदुस्थानांत तयार करण्याचे कारखाने स्थापन झाल्या शिवाय हिंदुस्थानचें कल्पाण व्हावयाचें नाहीं.

ता० १ एप्रील पासून दिवाणी कोर्टाकडील नाझरचें हिशेब इंग्रजींत ठेवण्याविषयीं सरकारचा ठराव झाल्याचें कळतें.

लांकडी रेलवे—ब्रिटिश कानडा आणि युनायटेड स्टेटस मध्यें लांकडाच्या रेलवे आहेत. क्वीबेकमध्यें असली ३० मैल रेलवे आहे. हे रूळ म्यापल लांकडाचे असून ४ इंच रुंद आणि ७ इंच जाड असतात. ह्यावरून दर तासास २५ मैल वेगानें गाड्या जातात. ह्या रेलवेवरून फक्त लांकडें नेण्या आणण्याचें मात्र काम चालतें.

रुपयाचा भाव उतरल्यामुळें आपल्या कुटुंबांच्या खर्चासाठीं व मुलाबाळांच्या विद्याभ्यासासाठीं पैसा पाठविण्यांत, फर्लोचा आणि इतर रजेचा पगार मिळण्यांत आपलें अतोनात नुकसान होतें अशी युरोपियन कामगारांनीं जी ओरड चालविली होती तिची थोडीशी दाद लागली. यां संबंधाचा कायमचा निर्णय होईपर्यंत १८९३।९४ सालीं युरोपियन कामगारांचा फर्लोचा व इतर प्रकारच्या रजेचा पगार, कुटुंबांच्या खर्चीसाठीं विलायतेस पाठवावयाचा पैसा १ रुपया ह्मणजे १ शिलिंग ४-¾ पेन्स या भावानें विलायतेस द्यावा असें स्टेट सेक्रेटरी यांणीं ठरविल्याचें समजतें. हल्लीं एका रुपयाची किंमत १ शिलिंग २॥ पेन्स आहे ह्मणजे भावापेक्षां २ पुर्णांक १ चतुर्थांश पेन्स युरोपियन कामगारास जास्त देण्याचा ठराव स्टेट सेक्रेटरी साहेबांनीं केला. एवढ्यानें हिंदुस्थानेच किती नुकसान होईल हें एक परमेश्वर जाणे. हिंदुस्थानच्या लोकांस उद्योग धंद्यांचें उत्तम शिक्षण देण्या साठीं शाळा स्थापण्यास सरकारापाशीं शिल्लक नाहीं असें कारण दाखविलें जातें, तेंच कारण युरोपियन लोकांच्या तक्रारीस दाखविलें जात नाहीं. हा केवढा अन्याय? शु० सु०

मार्निंगपोष्ट पत्रांत अशी एक बातमी प्रसिद्ध झाली आहे कीं, हिंदुस्थानांतील रुप्याचे नाण्याच्या टांकसाळीं बंद करावयाच्या नाहींत असें विलायत सरकारचे मंजुरीनें हिंदुस्थान सरकारानें ठरविलें आणि उत्पन्न वाढविण्याकरितां विलायतेहून हिंदुस्थानांत येणाऱ्या मालावरील 'इंपोर्ट' जकात पुन्हा बसविण्याचा विचार त्यानें केला आहे. ही बातमी सरकारानें अगदीं गुप्त केली होती, ती बाहेर पडली आणि तेव्हां पासून विलायती मालाची व विशेषतः राकेल तेलाची किंमत शेकडा १० टक्के प्रमाणें वाढली आहे.

मुंबई इलाख्यांत लष्करास आटा पुरविण्याकरितां ज्या सरकारी पिठाच्या गिरण्या आहेत, त्या येत्या एप्रील पासून बंद करण्यांत येणार व पिठाचे मक्ते लोकांस देणार अशी बातमी आहे. पुणें येथें पिठाची मोठी गिरणी आहे, ती बंद करून ती यंत्रें रावळपिंडी येथें नेऊन तेथें मोठी गिरणी सुरूं करण्याचा विचार आहे.

असें म्हणतात कीं, स्वीडन आणि नार्वेच्या राजाची हिंदुस्थानांतील वैदिक ग्रंथाबद्दल मोठी पूज्यबुद्धी आहे त्यानें वैदिक ग्रथांवर जो कोणी चांगला निबंध लिहील त्याला एक सोन्याचा चांद बक्षीस देण्याचा प्रसिद्ध केलें आहे. व हें इनाम कोणत्या देशांतील विद्वानाला मिळेल. त्याचा खुलासा जिनोवा येथें निरनिराळ्या देशांतील विद्वानांची येत्या सप्तंबरांत जी एक सभा भरणार आहे, त्या वेळीं होईल. पाश्चिमात्य लोक आमच्या वैदिक ग्रंथांना मान देतात आणि आमचे कांहीं शहाणें लोक ते समुद्रांत बुडविण्याला तयार होतात, तेव्हां यांस काय ह्मणावें? क. त.

---

## जाहिरात.

सर्व लोकांस कळविण्यांत येतें कीं, कमेटीचे हद्दींतील कचरा वाहून नेण्याचा, स्लाटर हाऊसचा, स्टेशन धर्मशाळेचा, व आठवडे बाजारचा कर वसूल करण्याचा वगैरे मक्त्यांचा सन १८९३।९४ सालाकरितां हरास तारीख २८ माहे मार्च सन १८९३ इसवी रोजीं सकाळीं ७॥ वाजतां टौन हालांत केला जाणार आहे. ज्यांस घेण्याची इच्छा असेल त्यांनीं सदर्हू तारखेस हजर रहाण्याचें करावें कळावें तारीख ९।३।९३

मु० आफिस आकोला. Gopal Hari Secretary.

---

प्रसिद्धपत्रक.

प्रतिपच्चंद्ररेखेव वर्धिष्णोर्विश्ववंदिता
मुद्रा शहासुनस्येयं शिवाजस्य राजते

## श्री शिव छत्रपति

किंवा

तत्कालीन एक एतिहासिक कादंबरी.

अलीकडे मराठी भाषेच्या उत्कर्षार्थ नानाजागीं अनेक यत्न चालू आहेत, व चांगली चांगली वाचनीय वर्तमानपत्रें, मासिक पुस्तकें, व इतर पुस्तकेंही निघूं लागलीं आहेत. व त्यांचे योगानें मनोरंजन सदुपदेश इतिहास, शास्त्रीय विषय, इत्यादिकांचें ज्ञान संपादण्याचे मार्ग बरेच मोकळे होत चालले आहेत. ह्या कामीं थोडा बहुत तरी हातभर लावावा या हेतूनें बडोदें शहरांतील कांहीं विद्वान गृहस्थांचें मदतीनें "सद्विचारिणी" या नावाची सभा आज दोन वर्षे स्थापन झाली श्री. रा. सा. संपतराव गायकवाड श्री. रा. ब. गणपतराव गायकवाड, ( ब्यारिस्टर ऑट ला व सरदार कोर्टाचे जज्ज बडोदें ), व रा. ब. यशवंत वासुदेव अठल्ये ( एम्. ए., एल्. एल्. बी., असून नायब दिवाण राज्य बडोदें ) हे या सभेचे अनुक्रमें अध्यक्ष, उपाध्यक्ष, व अग्रेसर ( चेअरमन ) असून, या सभेपुढें आजपर्यंत बऱ्याच गृहस्थाकडून निबंध वगैरे वाचण्यांत आले आहेत, व त्यापैकीं कांहीं मालारूपानें या सभेचे अध्यक्षतेखालीं प्रसिद्ध करण्याचा विचार आहे. या मालेचे हें पहिलें पुष्प रा. रा. शिवराम गोविंद फाळके यांनीं तयार केलें असून, त्यांत हिंदुस्वातंत्र्याचे जनक जे श्रीशिवाजी महाराज, त्यांस हिंदुपद बादशाहीची स्थापना करण्यास कोणती घोरतम संकटें सोसावी लागली, व त्यांतून युक्तिमार्गानें ते कसे पार पडले, व दूरवर नजर पोंचवून हिंदुपद बादशाही दृढ करण्यास त्यांस काय काय उपाय योजावे लागले, वगैरे विषयांचे वर्णन केलें आहे. तरी प्रत्येक महाराष्ट्रभाषाहितेच्छूकडून या पुस्तकास पूर्ण आश्रय मिळेल अशी आशा आहे.

ह्या पुस्तकाची डेमी अष्टपत्री सांच्यानें सुमारें २०० पृष्ठ होतील. खालीं सह्या करणार ह्यानकडे रोकड वर्गणी अगर खात्रीलायक सह्या मार्च १८९३ अखेरपर्यंत देणारांस टपाल हांशिलासह इंग्रजी नाण्याचा एक रुपया पडेल. पुस्तक मार्च १८९३ अखेर तयार होईल. पुस्तकांत श्री शिवाजी महाराजांचें सुंदर चित्र देण्यांत येईल. छपाई व बांधणी मोहरेदार होईल आगाऊ आश्रयदात्यांची नांवे पुस्तकांचे शवटीं छापिली जातील. १२ प्रती घेणारांस किंवा १२ ग्राहक मिळवून देणारास १ प्रत फुकट दिली जाईल.

बडोदें तारीख १७—२—९३

शंकर मोरो रानडे. बी. ए.
भानु केशव गांगनाईक,
सद्विचारिणी सभेचे चिटणीस.

---

☞ हें पत्र आकोलें येथें कै० वा० खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

साहामाही " ३ " ८
सालअखेर " ७ " १८
किरकोळ अंकास ........................४

नोटिशीबद्दल.
१० ओळीचे आंत रु० १
पुढें दर ओळीस ०१०६
दुसरे खेपेस .......०१

Annum in arrears 7 „1Rs 8 as
Six monthly.............3 „ 8 as
Single copy..............................4as

# वऱ्हाडसमाचार.

## THE BERAR SAMACHAR.

Advertisemen
Below 10 lines...2Rs
per line over10... 4 as
Repetition perline 3 as

OL XXVII AKOLA MONDAY 27 MARCH 1893 NO.12

वर्ष २७ आकोला सोमवार तारीख २७ माहे मार्च सन १८९३ इ० अंक १२


## CLEMENTS TONIC

### दुखणेकऱ्यास संजीवनी

### क्लेमेंटचें टानिक.

( दुनियेचा पौष्टिक दवा )

क्लेमेंटचें टानिक ही रामबाण, त्वरित, आणि काय ती एकच खात्रीची औषधि आहे. तिच्या योगें मज्जूतील क्षीणता, शरीराचा व्हास, चेतनाशक्तीचा हीनपणा, साधारण अशक्तता, कण्यांतील थकवा, धातुश्राव आणि दुष्ट हवा, मनस्वी क्लेश, दगदग, दुर्व्यसन, दुरुपयोग, मूर्खपणा अगर अविचार या पासून शरीर क्षीण होऊन ज्या व्याधि जडतात त्या सर्व व्याधि व रोग दुर होतात.

क्लेमेंटचें टानिक स्वाभाविकपणेंच मनुष्याच्या शरीराला हुषारी आणते, क्षीण व अशक्त मनुष्यास तजेला व शक्ति देते. कमकुवत मनुष्यास सदृढ, बळकट व वीर्यवान बनवितें आणि नाजूक स्त्रिया बांध्यानें मजबूत व पाणीदार अशा करितें.

तरुण, मध्यम वयाचे, व ह्यातारे पुरुष व स्त्रिया यांस खात्रीचे गुणावह औषध म्हणजे क्लेमेंट टानिक असें आढळेल. शारीरिक मानसिक मनस्वी दगदग, दुःख, उघड्या हवेंत राहणें, गुप्तस्राव, छांदिष्टपणा यां पासून ज्यांना विकृति जडतात अथवा ज्यांनीं अज्ञानपणानें व खोडसाळपणानें प्रकृति बिघडून घेऊन स्वतांवर अनेक दुःखें ओढून घेतलीं त्या सर्वांस याचा गूण आला आहे. शरिर क्रमाक्रमानें थकत चाललें असतांना त्या व्हासाचीं लक्षणें या औषधानें तानडतीच नाहींतशीं होतात आणि कमी कमी झालेल्या शक्ति पूर्वी प्रमाणें जोमदार होऊन प्रकृति निर्दोष होते. मुख्य मुख्य इंद्रियें कमताकत झालीं, मेंदू बिघडला, शरीराचे व मनाचे व्यापार कुंटले, विचारांचा घोटाळा झाला, ज्याला त्याला भरंवसा वाटेनासा झाला, स्वभाव अनावर व शीघ्र कोपी झाला, उदासीनता व भित्रेपणा वाटला, गुडघे व पाठ थकली, छाती धडधडूं लागली, वातशूल झाला, कंबरेंत सलका मारल्या तसेंच पाठींत दुखणें वेळोवेळ दांत दुखणें अवयव तिडकणें झोंप नाहींशी होणें, कपाळ दुखणें पद्दाटेस थकवा येऊन अवयव दुखणें, मूत्रपिंड व मूत्राशय यांची आग होणें लवकी पांढरि होणें परमा व गुप्तस्राव यांनीं धातुपात होणें या व्याधि झाल्या अथवा स्त्रीपुरुषास आपल्या जन्मांतलीं कर्तव्यें व जबाबदाऱ्या बजावण्यास नालायक करणारा व त्यांच्या कामांत व्यत्यय आणणारा असा मानसिक व शारीरिक कोणताही आजार झाला तर या सर्वांवर क्लेमेंटचें टानिक हाच एक उत्तम उपाय ठरला आहे व ठरत आहे.

क्लेमेंटचें टानिक हें खरोखरीच मनुष्यमात्रास एक ईश्वरी देणगीच मिळालेली आहे हें घेतल्या बरोबरच आपला रोगनाशक अद्भुत प्रभाव दाखवूं लागतें. ह्याविषयीं घेणारांची साक्ष सर्वत्र व विश्वसनीय अशी आहे. ते ह्मणतात कीं, ह्याच्या प्रत्येक भागानें गुण येऊं लागतो. हें ज्ञानतंतुची जबरदस्त शक्ति वाढविणारें टॅानिक असून हें शरीरांतील सर्व अवयवांना व स्नायूंना ज्ञान तंतु योगानें पूर्व स्थितीवर आणणारें शक्तिदायक सत्व पोहोंचवितें; इतकेंच नाहीं पण तीक्ष्ण रोग थकवा, मेहनत, अतिश्रम अथवा कित्येक कुकर्माच्या योगें शरीरप्रकृति अशक्त झाली असली, किंवा जेंव्हा ज्ञानतंतूंची अशक्तता, साधारण किंवा स्थानिक अशक्तता चालूं असेल तोंवर कोणत्याही कारणानें अशक्तता आलेली असली तरी हें औषध घेतल्यावर गुण आल्यावांचून राहणार नाहीं. जोपर्यंत क्षीणता व ज्ञानतंतूंची अशक्तता हींच रोगाचीं कारणें असतील तोंपर्यंत, क्लेमेंटचें टानिक हाच एक उत्तम उपाय आहे.

रोग्यांनीं लक्षांत ठेवावें कीं क्लेमेंटचें टानिक हेंच एक खात्रीचें औषध आहे, सर्व गांध्याकडे व बाजारांत तें विकत मिळेंत F. Moor Clements.ही सही पेटीच्या बुडाशीं व वरच्या भागीं पाहून त्याची खात्री करून घेतांनां सावधगिरी ठेवावी, आणि जे नकली औषधें विकतात त्यांच्या पासून घेऊं नये. 'क्लेमेंटचें टानिक 'नांवानें शोध करा, आणि तेंच अस्सल औषध घ्या. हाड, मज्जा, व स्नायु ही यानें बनतात, आणि रक्त व मेंदु यांना हें फार मानवतें. हें घेतल्यानें प्रकृति सदृढ, बळकट, ताकतदार, आणि जोमदार होते आणि दुनियेंत या सारखी ईश्वरी देणगी दुसरी नाहीं.

इंडियांतील एजंट—केंप आणि को, ट्रेचर आणि को मुंबई, बालंटाईन को; स्मिथ, स्टानिस्ट्रिट को, बोनन को, कलकत्ता; डब्ल्यू इ. स्मीथ को, मद्रास; एन. एस. फरनानडो, कोलम्बो; आणि सर्व ठोकळ व किरकोळ गांध्याचीं दुकान.

F. M. Clements, Inventor Sydney, Australia.


## पत्रव्यवहार.

ह्या सदराखालील मजकूर पत्रकर्त्याच्या मतास मिळून असतील असें समजूं नये.

वाशीम ता० ११—३—९३

मि. चिंतामणराव आपटे रजिस्ट्रेशन खात्याचे इन्स्पेक्टर, यांची स्वारी आपल्या एस्टॅबलिशमेंट सुद्धां येथें दीड महिना सुमारें होती त्यांचें काम आटपल्यामुळें ते आतां यवतमाळाकडे गेले. ते मोठे हुद्यावर आहेत तरी त्यांना गर्व अगदीं नाहीं. मन मोकळे करून ते सर्वांशीं बोलतात. आपल्या हाताखालच्या लोकांना मोठ्या ममतेनें वागवितात आपल्या कामांत फार हुशार असून ते सर्व लोकांत प्रिय आहेत. ते नेहमी उद्योगी असतात, आपलें काम संभाळून ते फावल्या वेळांत पुस्तकें लिहिण्याचें काम करितात. त्यांनीं लिहिलेलीं चार दोन पुस्तकें लोकांत प्रसिद्ध आहेत. त्यांनीं हल्लीं "श्यामभट्ट" या नांवाचें पुस्तक लिहिलें आहे. हें अगदीं निराळ्या प्रकारचें असून त्यांतील विषय ही फार सुरेख रितीनें प्रतिपादन केले आहेत. हें पुस्तक अजून तयार होत आहे. हें फारच नामी आहे. तयार झाल्यावर लोकसमूहापुढें येईलच. लोकांनीं तें जरूर वाचून आपलें मनोरंजन करून घ्यावें. यांत ग्रंथकारानें आपल्या कल्पनाशक्तीची कमाल करून सोडली आहे. भाषा अगदीं सोपी आहे. तेव्हां तें सर्व लोकांना समजण्या जोगें आहे.

मि. चिंतोपंत पोतदार मंगरूळपीर यांची बदली बढतीवर होऊन ते येथें हुजूर नाझर कचेरींत जप्ती कारकून झाले त्यांच्या पश्चांत मंगरूळपीर येथें एक स्टॅम्प त्यांच्या कारकीर्दींत कमी असून त्या बद्दल त्यांनीं कांहीं कळविलें नाहीं असा यांच्यावर त्या बाबतींत ४०९ कलमा प्रमाणें फौजदारींत खटला चालला परंतु अखेर त्यांच्या सुदैवानें ती चौकशी मि. अंबादास संतो यांचपाकडे आली. त्यांनीं या कामीं फार चांगली चौकशी करून तो स्टॅम्प नजरचुकीनें एका वेंडरकडे गेला होता तो बाहेर काढिला व ४०९ कलमांतून चिंतोपंताना मुक्त केलें. दुसरा अलगरजू मॅजिस्ट्रेट असतां ह्मणजे खरोखर ब्राह्मण बळी पडला असता. या बद्दल ताऱ्या साहेब फारच स्तुतीला पात्र आहेत. अझून पर्यंत चिंतोपंताना नोकरीवर रजूं करून घेतलें नाहीं मोठें आश्चर्य! मि. हेअर साहेब बहादूर डे० कमिशनर यांच्या कारकीर्दींत अशा कामीं वेळ लागावा ह्मणजे फारच नवल!

येथें मुनसिपालिटीचे ता० ११ रोजीं इलेक्शन झालें. जुनेच मेंबर कायम राहिले! शिकलेले, हुशार, चांगलें काम करतील असे लोक मुनिसिपालिटींत भरती झाल्यास चांगलें. परंतु योग येईल तेव्हां खरें! कळावें हे विनंती.

आपला,
"क्ष"

वऱ्हाडसमाचार

मिती चैत्र शुद्ध १० शके १८१५

दोन अडीच वर्षांपूर्वीं खेबायत संस्थानांत बंड झालें होतें आणि तें बंड होण्यास कारण कीं त्या संस्थानाचा सारा जो धान्याच्या रूपानें घेतला जात असे तो नव्यानें पैशाच्या रूपानें वसूल करण्याविषयीं जुलूमाचे व सक्तीचे हुकूम झाले. या हुकूमांची अंमलबजावणी फारच कडक व पीडाकारक झाली आणि ती इतकी कीं त्यांला तो नवा कायदा व त्याबद्दलचा ती पराकाष्टेचा जाच सहन न होऊन लोकांनीं बंडावा केला. दिवाण शामराव नारायण लाड यांच्या कारकीर्दींत ही गोष्ट घडली. त्यांनीं लष्कर बोलावून व तोफा चालवून लोकांची दाणदाण उडविली. आणि त्या पैकीं बहुतेकावर खटले करून त्यांस मोठमोठ्या शिक्षा दिल्या.

लोकांनीं बंड केलें ह्मणून त्यांस जबर शिक्षा दिल्या. हा प्रकार वरवर पाहणाऱ्यांस योग्य वाटेल पण लोकांचा छळ त्या साऱ्याच्या पैशा निमित्त कसा झाला होता हें ऐकलें ह्मणजे लोकांच्या हातून चूक घडली असें कोणीही ह्मणणार नाहीं. अन्यायानें लोकांस साऱ्याबद्दल कैद केलें आणि त्यांचा अतोनात छळ केला. लोकांच्या हातांत कड्या अडकविल्या आणि दोरानें त्यांस गुराप्रमाणें इकडून तिकडून फिरविलें. तसा ह्याअपेक्षेमध्यें उन्हांत झाडा खालीं बसविलें आणि त्यांस पाठीवर दगड देऊन तिष्टत उभें केलें. हे सर्व प्रकार एखाद्या घातुक व महान अपराधी कैद्याविषयीं करितात असें आपण ऐकतों पण तेंच प्रकार प्रजेनें सारा पैशाच्या रूपानें न दिल्याबद्दल खेबायत संस्थानांत करण्यांत आले.

ही सर्व गोष्ट विलायतेंतील दयार्द्र व कळवळ्याच्या हितचिंतकास कळली तेव्हां इंडियन पोलिटिकल एजन्सीचे मुख्य मि. बर्ट साहेब यांनीं स्टेट सेक्रेटरीस विनंती केली कीं, बंडवाले जे निरपराधी गरीब लोक तुरुंगांतील यमयातनेंत वृथा कालक्षेप करीत आहेत त्यांची बंदमुक्तता करून न्याय व्हावा आणि या विनंती बरोबर त्यांनीं तें प्रकरण सविस्तर, मुद्देसूत व खुलासेवार लिहून दाखल केलें. त्याची चौकशी अखेर होऊन त्या लोकांस मोकळे करण्याविषयीं हुकूम झाला आणि त्याबरहुकूम सर्व तजवीज झाली असा मुंबई सरकारचा गेल्या जानेवारी १३ तारखेचा खलिता आहे. मद्रासच्या 'हिंदु' पत्राचा विलायतचा बातमीदार लिहितो कीं वरील न्यायाच्या, व सात्विकपणाच्या मुत्सद्देगिरीचा उल्लेख इंडियांतील कोणत्याही वर्तमानपत्रांत नाहीं हें मोठें नवल होय. मि. बर्ट साहेबांस हा अखेरचा निकाल ८ फेब्रुवारीला इंडिया आफिसांतून कळला आणि तो विलायतेहून परत हिंदुस्थानांत कळेपर्यंत कोणाला ही कळला नाहीं या वरून किती गुप्त रितीनें राज्यकारस्थानें चालतात आणि नेटीव संस्थानांतील बातम्या बाहेर फुटूं न देण्याबद्दल

किती दक्षता असते हें वरील कथानकावरून सहजीं समजेल.

---

आयर्लंड देशाला स्थानिक स्वराज्य देण्याविषयीं मि० ग्लाडस्टन साहेबांनीं जो कायद्याचा मसुदा पार्लमेंटांत आणिला आहे त्याचें स्पष्टीकरण करिते वेळीं त्या जगद्विख्यात थोर पुरुषानें जो मुख्य मुद्दा सांगितला तो हिंदुस्थानासंबंधानेंही लागू पडतो. ते म्हणाले कीं सध्यां जी वस्तुस्थिति आहे तिजपासून दोन मार्ग फुटतात. एक मार्ग आयर्लंडला स्थानिक स्वराज्य देण्याचा होय आणि दुसरा मार्ग म्हणजे आयर्लंड देश पदाक्रांत करून ग्रेटब्रिटन खालीं जमीनदोस्त करण्याचा. या पैकीं पहिला रस्ता स्वीकारूं असें आम्ही वचनबद्ध झालों तेव्हांच आयर्लंड देशाशीं एकोपा झाला व त्यावरील सार्वभौमत्व मिळालें. परंतु जुनीं अभिवचनें मोडून ग्रेटब्रिटन सांप्रत त्या देशाची पायमल्ली करीत आहे. ही राजपद्धति अन्यायाची व कलंक लावणारी आहे. आणि असला कट्टा लावणारी सत्यपराङ्मुखता इंग्लंडनें पतकरूं नये म्हणून ग्लाडस्टन साहेबांनीं अंतःकरणाच्या देठापासून अस्खलित वाणीनें आपल्या बांधवास उपदेश केला तो सन्मान्य व शिरसावंद्य उपदेश हिंदुस्थान सरकारनें या देशासंबंधानें अंगीकृत केला आणि आपलीं दृढ आश्वासनें व करारांचीं वचनें पाळलीं तर आमची खात्री आहे कीं या देशासारखा स्वस्थ, राजनिष्ठ व सन्मार्गगामी देश इंग्रज सरकारास दुसरा क्वचितच मिळेल. महाराणी सरकारच्या अठवणीच्या जाहिरनाम्यांतील सोन्याचीं अक्षरें कोणीकडे आणि त्याला हरताळ लावून वारंवार शोध घातलेले कोणीकडे! हिंदुस्थानाविषयीं राजनीति किती अपमतलबाची, परतंत्रपणाची व उथळ दृष्टीची आहे हें सत्यही आम्ही सांगत आहों. जेथें जेथें राज्यकर्त्यांस आपला स्वार्थ साधून स्वतास चांगलें म्हणवून घेतां आलें तेथें त्यांचें कसें उदारपणाचें, भूतदयेचें, व परार्थपरायणतेचें होतें आणि म्हणून तेवढ्या सत्यप्रतिज्ञेच्या रक्षणाला वाचच इंग्रजी राज्य हिंदुस्थानांत श्रेयस्कर, चिरायु व लौकिकवान झालें आहे. परंतु या पलीकडचा कार्यभाग दुस्तर व स्वार्थाशीं विरोधी असा आहे आणि आयर्लंड देशाविषयीं ग्रेटब्रिटनचें जें कर्तव्य आहे व जें बजावण्यासाठीं सन्मणिमालेंतील मेरुवत् असलेले मि० ग्लाडस्टन उपदेश करितात तेंच कर्तव्य इंडियाविषयीं बजाविण्यासाठीं कोण आमच्या इंग्लंडदेशास उपदेशील बरें!

---

## वऱ्हाड हायस्कूल माजी विद्यार्थी समाज.

यंदाचा हा समाज उमरावतीस भरविला होता. दरवर्षाच्या नियमा प्रमाणें हा समाज हुताशनीचे दिवशींच भरला पाहिजे होता. परंतु यंदा हुताशनी निमित्त एकच सुटी व तिही रविवारास लागून नसल्यामुळें समाज चांगला भरणार नाहीं म्हणून वर्षप्रतिपदेच्या दिवशीं भरविण्याचें ठरलें होतें असें करून समाजास जितकी मंडळी येतील असा अजमास होता तितकीहि आली नाहींत कारण वर्षप्रतिपदेची असलेली सुटी सरकारी कचेऱ्यांसच होती. शाळांस नव्हती. यामुळें प्रांतांत बरेच दूर व शाळा खात्यांत असलेल्या आमच्या मित्रांस येता आलें नाहीं.

समाजाचे आदले दिवशीं रात्रीं रिसेप्शन कमिटीचे मेंबर रा. गो. बा. बापट, म. गं. दामले व. मे. पिंपळे. गो. द. खणकर वगैरे मंडळी समाजास येणाऱ्या लोकांचे स्वागता साठीं बडनेरा स्टेशनावर आली होती. मंडळी गाडी खालीं उतरतांच त्यांनीं सर्वांस मोठ्या प्रेमभावानें भेटून कुशलप्रश्न केले उमरावतीसही याच प्रमाणें बरीच मंडळी स्टेशनावर आली होती. मंडळीस उतरण्या करितां स्टेशना जवळच असलेले विश्रांति गृहाची योजना केली होती. हें गृह अतीव रमणीय असून त्यांत पुढील दरवाज्यावर "यावें महाराज" अशा अर्थाची इंग्रजींत व मराठींत सोनेरी अक्षरांनीं लिहिलेली एक कमान लाविली होती. दरवाज्या पासून आंतील गृहापर्यंत दोन्ही बाजूंनें आम्रपल्लवाचीं केलेलीं तोरणें लाऊन ठिकठिकाणीं वर्षप्रतिपदानिमित्त गुढ्या (आनंदाचीं निशाणें) उभारल्या होत्या दोन्ही कडेस थोडे थोड्या अंतरावर कंदीलही होते. समाजगृहांत ही ठिकठिकाणीं भिन्न भिन्न प्रकारचे दिवे लाऊन उत्तम तऱ्हेची रोषणाई केली होती व जेवण करून मंडळीस वर्षप्रतिपदे सारखा मोठा सण आपण घरीं करण्याचें सोडून आलों या बद्दल वाईट न वाटून उलट सुख होईल अशा प्रकारची तयारी केली होती समाज गृहाचे दारापाशीं सद्धा रिसेप्शन कमेटीचे मेंबर मंडळीस घेण्यास तयार होते.

सूर्योदय होण्याचे पूर्वीं "आतां सूर्योदय होईल व दहों ज्या महत्वाच्या कामास येथें आलो आहोत तें करण्यास आतां आपली निद्रा सोडून तत्पर व्हा" असें सुचविण्याकरितांच कीं काय मंगल वाद्य वाजूं लागलीं नंतर मंडळी उठून आपला शौच मुखमार्जन व स्नान संध्या वगैरे प्रातर्विधि आटोपण्यास लागली हें झाल्या नंतर चहा काफी करिता असलेली मंडळी "आपण आल्यानें आम्हास फार सुख झालें व हा कांतां आपल्यास आम्ही प्रेमानें हा चहा व काफी देतो" असें म्हणत म्हणत चहा काफीची पात्रें हातांत घेऊन मंडळीस देण्यास तत्पर होती विश्रांति गृहांत जमलेली मंडळी चहा वगैरे घेऊन समाजास लवकरच सुरुवात होईल म्हणून आपापले नवीन व विलक्षित पोषाक करून तयार झाली उमरावती शहरांत राहणारे समाजांतील गृहस्थही आपल्या बाहेरून आलेल्या मित्रांस मोठ्या उत्सुकतेनें भेटण्यास व समाजास कदाचित सुरवात होऊन आपण मागें राहूं म्हणूनच कीं काय बेहेद रडून मोठ्या लगबगीनें येत होते. तेथे आल्यावर आपल्या मित्रांस कुशल प्रश्न करून सर्व मंडळी विश्रांति गृहांतील मध्य जागीं (सभास्थानीं) जमली. त्या जागीं सुमारें सत्तर मंडळी आपल्या ऐपतीं प्रमाणें उत्तम पोषाक करून बसली होती. कोणी वऱ्हाडांतील पागोटी घातली होती, कोणी टोप्या घातल्या होत्या, कित्येकांनीं पुण्याकडील पागोटीं घातलीं होतीं व कित्येकांनीं पटके व फेटे घातले होते अशा तऱ्हेनें आलेली मंडळी एकत्र ठिकाणीं बसल्यावर समाजास सुरुवात झाली. प्रथम रा. व्यंकटराव मुधोळकर यांनीं मंडळीच्या ओळखी करून देण्यास सुरुं करून रा. गणपतराव नामजोशी यांनीं तें काम शेवटास नेलें. नंतर रा. मो. वि. जोशी बी. ए. एल. यांनीं सुचविलें कीं यंदा रा. म. गं. दामले यांस प्रेसिडेंट नेमावें व त्यांस रा. गणपतराव खापर्डे यांनीं अनुमोदन दिल्यावर रा. दामले यांनीं तें स्थान पत्करिलें, त्या समाजाचे आरंभास योग्य असें भाषण करण्यावर रा. व्यं. मुधोळकरांनीं गेले सालचे समाजाचे कामाचा थोडक्यांत पण झटकदार रिपोर्ट वाचला व तो सर्वानुमतें पसार झाला. नंतर रा. मो. वि. जोशी यांनीं अशी सूचना आणली कीं वऱ्हाडांत हायस्कूलांत शिकून मुंबईची परिक्षा पास झाल्या नंतर कित्येक गृहस्थांना कालेजांत उच्च प्रतीचे शिक्षण मिळविण्यास वऱ्हाड तर्फे दरमाहा २० रुपये प्रमाणें ३ वर्षे स्कॉलरशिप मिळाली आहे. ज्याप्रमाणें सरकारानीं मोठ्या उदार बुद्धीनें ही स्कालरशिप ठेविली आहे त्या प्रमाणेंच हे तीन वर्षांत मिळालेले ७२० रुपये त्या गृहस्थानीं (ज्यास ऐपत असेल त्यानीं) आपल्या हुशार, होतकरूं व गरीब अशा देशबांधवाना (वऱ्हाडातून शिकून तयार झालेल्याना) उच्च प्रतीचें शिक्षणाकरिता द्यावे व हे रुपये त्यानी स्वतः द्यावे अगर समाज मार्फत द्यावे. व हे असे जमलेले रुपये ज्यांस मिळतील त्यानीं त्यांचें शिक्षण झाल्यावर ते रुपये परत दुसऱ्या विद्यार्थ्यांस द्यावे. या सूचनेस जोडून दुसरी पोट सूचना अशी होती कीं वऱ्हाड हायस्कूलांत शिकत असतांना पुष्कळ विद्यार्थ्यांस स्कालरशिप मिळालेली आहे त्यांनीही आपल्या ऐपती प्रमाणे पैसे पुढें आपलें शिक्षण झाल्यावर परत द्यावे. त्या सूचनेवर झालेलीं भाषणें:—रा. व्यंकटराव मुधोळकर—असे दोन्ही तऱ्हेनें जमलेली रकम जशी जमेल त्या मानानें कालेजांत जाऊन शिकणाऱ्या गरीब मुलांसच न देतां हायस्कूलांतील गरीब विद्यार्थ्यांस दिली जावी असें केल्यानें गरीब मुलांस उत्तेजन मिळून त्यांचें दोन्ही प्रकारचे शिक्षण होईल.

रा. बळीरामपंत पिंपळे—ही सूचना फार चांगली आहे व विचार करण्या सारखी आहे. ही सूचना प्रथम आमचे परम पूज्य गुरुवर्य रा. रा. वि. महाजनी यांनीं काढली ते हायस्कूलांत असतां त्यांस मिळालेली रकम १००० रुपये त्यांनीं मुंबई येथें युनिव्हर्सिटीचे ताब्यांत देऊन त्याचे व्याजांत एक बक्षीस ठेविलें आहे. ही रकम दोन्ही कामास लावावी. आपले ऐपती प्रमाणें व आपल्यावर फार बोजा होणार नाहीं अशा बेतानें म्हणजे शेकडा ४ रुपये महिना देत जावा.

रा. धो. चांदेकर. हायस्कूलांतील शिक्षण मिळण्यास फार खर्च येत नाहीं. गरीब मुलास फार त्रास पडत नाहीं म्हणजे कोणी वार वगैरे लाऊन व आपली कांहीं तजवीज करून शिक्षण मिळवितात. परंतु अलीकडेस उच्चप्रतीचें शिक्षण मिळण्यास फार खर्च येतो पुर्वीं बीएची परीक्षा पास होण्यास तीन वर्षें लागत होतीं ती हल्लीं चार वर्षें लागतात व अलीकडेस मुंबई अगर पुणें येथें पुर्वीं जो खर्च लागे त्या पेक्षा जास्त लागतो. व या मुळें गरीब विद्यार्थ्यांस उच्च प्रतीच्या शिक्षणाची इच्छा सोडून नोकरी पाहण्याची पाळी येते. करितां ही रकम कालेजांत द्यावी.

रा. रा. खापर्डे — ही रकम हायस्कूलांतील व कालेजांतील विद्यार्थ्यांकडून घेऊन (त्यांचे ऐपती प्रमाणें) ती त्याच उपयोगा करितां म्हणजे हायस्कूलांतील व कालेजांतील शिक्षणाकरितां खर्च करावी. व जे कोणी (ज्यांस स्कालरशिप मिळाली ते) ही रकम देणार नाहींत त्यांस ज्या प्रमाणें कोणी एखानें हिंदु धर्माचे नियमाविरुद्ध वर्तन केल्यास जसे त्या धर्मांतील लोकांतून तो बहिष्कृत केला जातो त्या प्रमाणें ह्या समाजांतून त्यास बहिष्कृत करावें म्हणजे त्यांस ह्या समाजांत येण्याचा जो अधिकार आहे तो काढून टाकावा.

रा. व्यं. मुधोळकर—ह्या फंडास देणगी रूपानें ज्या सद्गृहस्थांची मदत देण्याची इच्छा असेल ती त्यापासून मोठ्या आनंदानें स्वीकारली जावी.

ह्याच वेळीं समाजांत हजर असलेले मि. हशमतअली अव्वल वकील उमरावती यांनीं मोठ्या उदार बुद्धीनें असें समाजापुढें कबूल केलें कीं जो मुसलमानी धर्माचा विद्यार्थी हायस्कूलांत पहिले वर्गांत पहिले पांच नंबरांत राहील त्यास दरमहा २ रुपये देईन.

ही देणगी समाजानें मोठ्या प्रेमभावानें स्वीकारिली. परंतु ही देणगी कोणत्या एका अगर दोन्ही हायस्कूलांत दिली जाईल याचा उल्लेख नाहीं तो समाजानें करून द्यावा.

नंतर ज्या विद्यार्थ्यांस वऱ्हाडांतील हायस्कूलांत स्कॉलरशिप मिळाली व ज्यास कालेजांत मिळाली अशा लोकांची यादी करण्यासाठीं रा. खांडेकर, दामले, मुधोळकर, जोशी, बापट, गुलकेका, गद्रे वगैरे गृहस्थांची सबकमिटी नेमून ही रकम दोन्ही प्रतीचे शिक्षणाकडेस खर्च करण्याचें सर्वानुमतें ठरलें.

या वेळीं दुसरी व फार महत्वाची अशी सूचना आली कीं वऱ्हाडांतील स्थानिक सरकारनें असें एक सर्क्युलर काढिलें आहे कीं जे कोणी मुंबई युनिव्हर्सिटींतून एल एल बीची परिक्षा पास होतील व ज्यांस वऱ्हाडांत वकिली करणें असेल त्यांनीं मुंबई हायकोर्टांत अगर तिकडील एखाद्या कोर्टांत ३ वर्षें वकिली केल्याचे सर्टिफिकिटा शिवाय त्यांस इकडे सनद घेऊन वकिली करण्यास परवानगी दिली जाणार नाहीं. हें सरक्युलर वऱ्हाडांतील हायस्कुलांत शिकून मग पुढें मुंबईस एलएल बीची परिक्षा पास झालेल्या गृहस्थांस फार अडचणीचें आहे. करितां यात फेर बदल व्हावा म्हणून स्थानिक सरकारा कडे समाजानें एक अर्ज करावा.

रा. रा. खापर्डे—माझी अशी पोटसूचना आहे कीं सदरहु सक्युलरानें जे कोणी मुंबईची म्याट्रिकुलेशन परीक्षा पास झाले नाहींत त्यास वऱ्हाडांत होत असलेल्या वकीलीच्या परिक्षेस या पुढें घेतलें जाणार नाहीं या मुळें आज कित्येक लोक ज्यानीं पुष्कळ पैसे खर्च करून व फार व बरेच मेहनत घेऊन कायद्याचा अभ्यास केला परंतु दुर्दैवानें अद्याप पावेतों ज्यांची ती परीक्षा उतरली नाहीं अशा लोकांस म्याट्रिक्युलेशनची परिक्षा नसल्यानें अगदीं लंगडे करून सोडिलें आहे

करितां सन १८९१ पर्यंत म्यॅट्रिक्युलेशन परिक्षा नापास असलेले परंतु वकिलीच्या परिक्षेस बसले ते जे वकिलींत पास होई पर्यंत परिक्षेस येण्याची परवानगी मिळावी. हें सक्युलर दोन्ही प्रकारचे लोकांस घातुक आहे म्हणजे. सर्व शिक्षण वऱ्हाडांत मिळून मग मुंबईची एल् एल् बीचा परिक्षा झाल्यावर आपले वऱ्हाडांतील घरदार सोडून मुंबई इलाख्यांत ३ वर्षे वकिली करावी व मग वऱ्हाडांत येणें असल्यास तिकडे झालेली ओळख व जमत आलेला धंदा सोडून ईकडे यावें व नंतर नवी विटी व नवें राज्य ह्या ह्मणीप्रमाणें पुन्हा नव्या ठिकाणीं आपला धंदा सुरूं करावा. येणें करून त्या पास झालेल्या वकिलाची बरीच नुकसानी होते. येणें प्रमाणें संभाषण झाल्यावर सदर्हू सरक्युलरांत दुरुस्त व्हावी अशा आशयाचे समजुतीचे एक पत्र सरकारास पाठवावें असें सर्वानुमतें ठरून रा. खापर्डे, जोशी. बापट, व दामले यांची एक सब कमेटी नेमून सभा बरखास्त करण्यांत आली.

(पुढें चालेल.)

# The Berar Samachar

MONDAY MARCH, 27 1893.

## MAHADAJI SINDHIA

(Continued from 9th. issue)

Another distinguishing feature of our hero's character is that he was a prudent politician. He made use of the experience he obtained by his contact with the English either as enemeis or a friends. Though at times Madhaji was successful against the English still at other times he was not so and he took a lesson of the fact and never afterwards even attempted to be unfriendly with them. He made them his best friends and subservient to the purposes he held out before himself. The superiority of the English army on account of the discipline was a lesson which Mahadaji learnt and his successors whether immediate or remote never bore in mind. The result of his wise policy was that he maintained his eminent position till the last to the glory both of himself and his nation. DaulatRao Sindia because of his imprudence lost all the influence which his uncle had secured for his house. As the head of the administration of the Empire he caused, it is said, a demand to be made upon the English who were bound by stipulations to make certain payments to the Emperor. This demand was reented and Madhaji withdrew from the same; and assured the Governor General that he (the Governor General) was supreme in his own dominions but that for his own part his sole object was to extend and conserve the Imperial authority in those parts of India which still remained subject to the Emperor when on a former occasion a similar demand was made and similarly resented, Mahadaji withdrew from it and secured for himself and his nation a strong alliance on the part of English and the general tranquility of India. Mahadaji was not a weak minded pussilanimous statesman. He was bold whenever occasion required him to be so; and held his own even in argument against others. When the Convention at Wadgaon was being discussed and the agent of the Engfish stated that he possessed no autority for the cession of certain territory taken by the English before the war, Mahadaji Sindhia said "Show us then the authority by which you hav broken the treaty of Purandher." How he was a match to the clever political tactics of the English is best seen from another fact narrated in Mr. Keen's book. The English at Calcutta wished to have an agent of their own in the Court of Poona. Mahadaji did not quite approve of the proposal. He thought this would weaken his own influence in the Poona Darbar. Therefore he represented to the then English authorities that he himself was their agent and had always looked to their interests there, and they may be rest assured that they would be well secured Of course the cautious English did not like the idea and did after all send their agent to Poona. His conquest of Jaipur and Jodhpoor and the establishment by him of Maratha influence there shows clearly that he was a man bold in action. Likewise he retook from the Raona of Gohad his fort at Gwalior of which he was deprived by the English. What he desired to secure from the English agents was a free hand in the politics of Hindustan proper and this he secured by the treaty of Salbye in addition to a large portion of territory formerly belonging to him.

Mahadji was not one of those idle princes whom we see in numbers now for he did much towards establishing our former basis the Maratha dominion. He constructed a road via Gwalior to Delhi, disciplined his army after the model of the Europeans and secured able and faithful Generals from amongst the Indians and Europeans. Lakhoba Dada Shenvi Brahmin by caste and General De Boigne are the best examples of the officers of his Army. He concerned himself personally with foreign policy and war while the Civil administration he left in the hands of able Civilian Officers. He took extreme care in the selection of officers and amply rewarded those who served him faithfully and loyally; while he severely punished others who were not so. And it is believed that at no period in the history of that fertile country (Malwa) have the people lived in more peaceful or prosperous enjoyment of their natural advantages or had a more truly popular government than under these two benevolent rulers (Ahlyabai at Indore and Mahadaji Sindhia at Ujain). Mr. Keene "was informed by that eminent Maratha Statesman, the Hon. Sir Dinkar Rao, that it was a tradition in high Poona society, handed down from aged men who had known Madhav, that he was an excellent and indulgent master; unforgiving only towards officers who showed cowardice in the battle. To all others his favour was equal, solely apportioned to merit without regard to creed, caste or color".

If we say that he was far allove the ordinary mortals in worldly wisdom we shall do injustice to the great man. He was free from foolish prejudices. To the last he did not adopt a son to himself. He named his nephew Daulat Rao as his successor; and to the extensive domains of Mahadaji, Daulat Rao succeeded. His habits were simple. His dress was simple. He cared more for the substance of power than its show. When he went to Poona to present the two patents from the Emperor to the Peishwa, he carried in his arms the Peishwa's old shoes and though repeatedly invited to take seat along with the Peishwa, he decined to take it excusing himself that he was a mere servant and must remain at his proper place. His sole object was to secure for himself high influence in the Poona politics. We cannot refrain from quoting a whole para from our author's book which clearly exhibits Mahadaji's superiority over his contemporaries. "It is no part of our task to trace in detail the result of this but a few of them may be profitably noted in illustration of the peculiar difficulties of the position that we have been considering and of the peculiar qualities implied in the fact that Madhava had overcome them. The difference which separated the prudent soldier, who knew his own mind and made his own fortune, from the vacillating youth bred in indulgence and attentive to obsequious followers, soon became apparent. Madhav, as we have partly seen, had always proposed to himself the difficult but singularly original scheme of creating a position in which he should combine the delights of independent power with the advantage to be derived from continuing a member of the Confederacy of which the Peishwa was the President. To do this he found it necessary to rule and fight with unremitting vigour in Hindustan while he trimmed the diplomatic balance at Poona: further, contriving tostand well with the P.Nna be respected by Holkar, and preserve the frienly neutrality of the British. But he abstained from doing violance to Maratha loyalty or drawing his sword in quarrels about the succession. He did not resist the British when he found them to be earnest, and he never drove Holkar to despair"

We earnestly entreat our princes to follow in the foolsteps of this great leader of the Marathas of the 18 th century. They will raise themselves and their country in the estimation of the world.

---

We reserve our reply to the 'Citizen' whom we were surprised and rather grieved to see rushing to our local contemporary the 'Vaidarbh'. His volent fury on Mr. Aitken would certainly have been welcomed and looked decent partisularly in that organ had it been backee up by force of argument. We have however to record our consolation that the main points of our article have been acknowledged by our citizen. "Times have certainly changed" and a time for the revelation of proofs too is come. We are prepared to prove every word in our article of the last issue and we wish our citizen patience.

## वऱ्हाड

मि. मिरझा सफदर अलीबेग एक्स्ट्रा असि. कमिशनर, केळापूर यांस दोन महिन्यांची हक्काची रजा एप्रिल १५ वे तारखे पासून मिळाली.

उमरावती शहर मुनसिपालिटींत सहा सभासदांची सालवारी प्रमाणें नवी निवडणुक झाली त्यांत जुने चार कायम राहून रा. रा. गोविंद व्यंकाजी खोत एल. एम्. अँड एस व रा. रा. प्रल्हाद नारायण जोग बी. ए. एल. एल. बी. हे दोन नवीन गृहस्थ निवडल्यांत आले.

रा. रा. नारायण रावजी शिंदे नायब तहशिलदार यांस मंगरूळपीर हे सरकारी कामावरून दूर झाले असें कळतें.

रा. रा. नारायणसिंग भूसिंग तहशिलदार, नेरपिं. यांस उमरावती जिल्ह्यांत ९ रे वर्ग माजिस्ट्रेटचे अधिकार मिळाले.

इलिचपूर शहर मुनसिपालिटीचे सरकार मर्फतच्या जुन्या सभासदांची मुदत संपल्यावरून त्यांच्या जागीं नवीन सहाजण नेमले त्यांची नांवें:—डेपुटी कमिशनर; पोलिस सुपरिंटेंडेंट; असि. कमि; सय्यद अमजद हुसेन आनररी माजिस्ट्रेट; रघुनाथ गिरराव रामचंद्र तहशिलदार; आणि व्यंकटराव हणमंतराव देशमुख.

रा. रा. गोविंद गंगाधर दामले तहशिलदार, चांदुर यांस दोन महिन्यांची हक्काची रजा तारीख १५ एप्रिल पासून मिळाली आणि त्या रजेंत तेथील नायब तहशिलदार रा. रा. नारायण गोविंद यांस आफिशिएटिंग तहशिलदार नेमले.

बाशीम मुनसिपालिटीच्या तर्फेंत क सिविल स्टेशन देऊन त्या भागा करितां दोन गृहस्थ सभासद नवीन नेमले तेः- सिम्पसन असि. कमिशनर, आणि मि. व पोलिस सुपरिंटेंडंट.

---

## नमुना नंबर १४३

कोणी स्थानापन्न होतो तेव्हां त्याच्या वसूल करितां येण्यासाठीं सरटिफिकिट काढावें ह्मणून त्यानें जिल्हे कोर्टास अर्ज केल्या विषयीं जाहिरात.

सन १८८९ चा आक्ट ७ प्रमाणे
वर्ग १९
दि. कि. मु. नं.

१०

विद्यमान डिपुटी कमिशनर सा० जिल्हा इलिचपूर यांचे कोर्टांत.

नांव—यशवंतराव
बापाचें नांव—नारायणराव देशपांडे
राहणार—अंजनगांव ता० दर्यापूर
जि—इलिचपूर यांस मयत.

नारायणराव बापाचें नांव केशवराव पांडे राहणार अंजनगांव तालुके दर्यापूर जिल्हे इलिचपूर यांचे वसूल करितां येण्या साठीं सरटि मिळावें ह्मणून सदरहु अर्जदार यानें अर्ज केला आहे यास करितां सदर्हू मयत यांचे माल मिळकतीवर किंवा तिचे कांहीं भागावर आपला हक्क आहे ह्मणून ज्यांचा दावा असेल त्यास जाहिरातीनें कळविण्यांत येत आहे कीं त्यानीं ता. हे एप्रिल सन १८९३ इ०रोजीं सदर्हू अर्जाची चौकशी चिखलदरा येथें होईल त्यावेळीं कोर्टांत हजर होऊन आपआपले हक्काची खरी हकीकत दाखल करावी. माहे मार्च सन १८९३ इ०

W. Hasting
डे० कमि० इलिचपूर।
ज्यूडिशियल

---

## अकोला बाजारभाव

हुंडी मुंबईची दर्शनी.... .... .... ९
" १९ दिवसांच्या मुदतीची.... ९
सुवर्ण २६॥ .... .... रुपें ....
मीठ....३॥। .... आळशी मापी
नवस वजनी ११२॥.... चणे
गहूं काठे.......... ८९ बनशी .
साखर.... ३॥....कराळे.... ...
उडीद....३।.... .... मुग२॥।
जवारी ५५....५७॥ ....सर्की..
तूप.... ९ ... ........... तेल
क.पूस....४५–५६..........रुई ७

सध्याचे भाव (इंग्रजी)

गहू वैशाख शुद्ध १९४९ .......
आळशी चैत्र "......."........
रुई फाल्गुन.........."........
सर्की वैशाख नवे सालचा".........
जवारी.... वसंत........"..........

---

## वर्तमानसार.

पोलिसचा प्रताप व त्यांस शिक्षा—काशीच्या पोलिसची व वनियाची मोठी मारामारी झाली अशी बातमी मागें उठली होती, ती माजिस्ट्रेटच्या चौकशींत खोटी ठरली, एवढेंच नव्हे उलट पोलिसांनीं घरें फोडली व जुलमानें कबुली करून घेतली असें माजिस्ट्रेटच्या चौकशींत शाबीत झालें. पोलिस शिपाई इश्रीसिंग यानें घरफोडीचा गुन्हा केल्याचे शाबीत झाल्यावरून त्यांस दोन वर्षें सक्त मजुरीनिशी कैद आणि पांचशे रुपये दंड व जुलमानें कबुली करून घेतल्याच्या गुन्ह्याची शाबीतीमुळें आणखी तितकीच शिक्षा माजिस्ट्रेटनें दिली दुसरा पोलिस शिपाई जावदहुसेन यानें जुलुमानें कबुली करून घेतल्याच्या व त्यास मदत केल्याच्या गुन्ह्याची शाबिती त्याजवर झाल्यामुळें त्यास दोन वर्षें सक्त मजुरीनिशीं कैद व ५०० रु. दंड अशी शिक्षा मिळाली.

स्टेट सेक्रेटरींवर फिर्याद—श्याम नगर बागाच्या गिणीचे मालक यांचा माल सरकारी रेलवेवरून जात असतां सारा आणि अमेरिका यांच्या मध्यें जळाला. त्याच्या नुकसानी बद्दल २५,००० रुपयांचा दावा मालकांना स्टेट सेक्रेटरी यांच्यावर अलिपूर येथील दिवाणी कोर्टांत लाविला होता, तिचा खर्चा सुद्धां हुकुमनामा त्या कोर्टानें फिर्यादी वर दिला.

नाटकांत राजकुमारी— कलकत्यास एक नाटक कंपनी हल्लीं खेळ करीत आहे. त्या नाटक मंडळींत मणिपूरच्या माजी राज घराण्यापैकीं कांहीं राज कन्या आहेत असें एका इंग्रजी पत्रांत लिहिलें आहे.

लढाईचें वेडेपीक— ग्रेटब्रिटनच्या नौकाखात्यानें लढाऊ आगबोटी, टारपेडो होड्या बांधण्या करितां ५० लक्ष पौंडाचें सांक्सन मागितलें आहे. लढाईच्या तयारीचें वेड जगांत अतिशय माजत चाललें आहे, तें कधीं मोडेल तो सुदीन समजावा.

सरहद्दीचा खर्च— गेल्या साडेसात वर्षांत सरहद्द बळकट करण्यासाठीं १९८ लक्ष रु. खर्च झाले. असें लार्ड राबर्ट यांस दिलेल्या मेजवानीच्या वेळीं त्यांनीं सांगितलें. शु. सू.

जबर व्याज घेण्याचा परिणाम—फेराजपूर जिल्ह्यांतील कोटइसाखान येथील प्रसिद्ध व्याजानें पैसा देणारा हरी मल याचा मुलगा मथुरादास हा बैलगाडींतून आणखी ३ असाम्यांसह प्रवास करित असतां ठार मारला गेला. असें ह्मणतात कीं आजूबाजूचे लोक ह्याच्या व्याजाच्या मोठ्या दरांना व चक्रवाढ व्याजाला पुष्कळ दिवसां पासून त्रासलेले असल्यामुळें ह्याचा सुड उगविण्या करितां टपुन बसले असावे. ह्याचे बरोबरचे एका इसमानें ह्याचा बचाव करण्या करितां मध्यें पडल्यामुळें त्याचा त्यांनीं पाय मोडून टाकला. इकडे जबर व्याज घेणारे लक्ष देवोत.

अमृतसर येथील धनाढ्य लोकांनीं एक फार मोठी कापसाची गिरणी काढण्या करितां एक कंपनी काढली आहे. पंजाबांत ही आनंदाची गोष्ट प्रथमचीच आहे.

१८५७ सालीं हिंदुस्थानांत फक्त ३०० मैल रेलवेचा रस्ता होता. आणि १८९२ त १८००० मैल झाला.

हैद्राबादचे मुख्य प्रधान सर अस्मानजा हे तेथें गेलेल्या युरोपियन नाटकांतील मिशेस शॉ ह्या बाईनें आपले काम उत्कृष्ट रीतीनें बजावले असें पाहून इतके खुष झाले कीं त्यांनीं तिला एक लाख रु. किंमतीचा रत्नांचा हार बक्षीस दिला असें समजतें.

उत्तर हिंदुस्थानांतील मुख्य उद्भिज्ज धाटले ह्मणजे गहूं होय. त्याचें वर्षाचे सरासरी ठोकळ मानानें उत्पन्न धरलें ह्मणजे २० कोटी मणांचे आहे. त्या पैकीं सुमारें कमीतकमी शेंकडा ७ या प्रमाणानें पीक नाश होऊन फुकट जातें ह्मणजे सुमारें ५० लाख रु. चें नुकसान होतें. हें इतकें पीक किडिच्या भक्षार्थ जातें. सु प.

पिकाचें उत्पन्न व माणसांची गुजराण ३१ एकर जमिनीवर एका मांसाहारी माणसाची गुजरण होते तितक्याच जमिनींत गहूं पेरलेतर ४४ माणसांची गुजरण होते. ओट धान्य पेरलें तर ८८ माणसांची; बटाटे बाजरी वगैरे पेरलीतर १६६ माणसांची; व ज्यांना सागू किंवा भाकरीचीं झाडें ह्मणतात त्यांची लागवड केली तर ६००० माणसांची गुजरण होते.

शहाणी— गाय—नरसिंगपूर जिल्ह्यांतील तेंदुखेडा येथील एका गाईचा प्रत्यक्ष चमत्कार पाहून येऊन एक गृहस्थ असें कळवितो कीं, तेंदुखेडा येथें एका साधुजवळ एक गाय आहे. प्रतिदिवशीं प्रातःकाळीं हे साधु महाराज त्या गाईचे गळ्यांत आपली झोळी बांधून देतात. ती गाय ब्राह्मण वगैरे शुद्ध जातीच्या दारांशीं जाऊन भिक्षा मांगून आणिते. ती मुसलमान वगैरे नीच लोकांच्या दारांशीं मुळींच जात नाहीं. कदाचित् कोणी नीच लोकांनीं त्या झोळींत भिक्षा घालण्याचा प्रयत्न केला तर तो सफल होत नाहीं. झोळी भरली ह्मणजे ती गाय आपोआप घरीं चालली येते ही गाय त्यांची मुलगीच समजली पाहिजे.

युरोपांतल्या राष्ट्राची व्यवस्था पार्लमेंट मार्फत होते मेंबरास जरी पगार नसतो तरी त्यास सभेंत हजर झाल्याबद्दल जी फी द्यावी लागते, त्याबद्दल दरसाल कोणत्या देशास किती खर्च लागतो त्याचे आंकडे पुढील प्रमाणें आहेत फ्रान्स ८००००० फ्रांक, स्पेन २२३०००० फ्रांक; इटाली ११५०००० फ्रांक; आस्ट्रिया १८०००० फ्रांक; इंग्लंड १२ ९८००० लाख; बेलजम ९००००० फ्रांक व पोर्टुगाल ७९३००० फ्रांक; या पार्लमेंटा सारखीच जी एक जर्मनीची सभा आहे तिचा खर्च ४८०००० फ्रांक आहे.

मद्रास प्रांतांतील दुष्काळ— मद्रास इलाख्याच्या दक्षिण भागांत गेलीं दोन सालें पाऊस चांगला पडला नाहीं, व यंदा ही पावसानें तशींच टाळाटाळ केल्यामुळें त्या भागांत लोकांचे फार हाल चालले आहेत. रामनाद जमीनदारींतील सुमारें ३०००० मनुष्यें पोटाच्या आगीमुळें माणसें आणि गुरें ढोरें घेऊन दुसरीकडे पोटें भरण्यास गेलीं, असें मद्रास टाइम्स पत्रांत प्रसिद्ध झालें आहे.

विलायत सरकार आपले लढाऊ आरमार फार वाढवीत आहे. आगबोटीस बुडविणारे टारपेडोबोटीस नवे करण्याचा बेत असून दोन इतके बडे क्रुसर करण्यांत येणार आहेत कीं, त्या प्रत्येकांस ७,००,००० पौंड ह्मणजे सवाशे लाख रु. खर्च लागणार आहे. जगांत इतके मोठे क्रुसर कोठें हि नाहींत. दोन लढाऊ गलबत बांधावयाचीं असून तीन सेकंड क्लास क्रुसर करावयाचे आहेत व दोन स्लुप करावयाचे आहेत. या सर्वांस मिळून ५००००० पौंड ह्मणजे सुमारें ८०००००० रुपये खर्च व्हावयाचे आहेत असें विलायतची तार सांगतें ही सर्व तयारी कशा करतां हें मात्र समजत नाहीं. ज्ञा. सि.

पामीर संबंधानें जास्त विचार करण्याचे रशियानें तूर्त तहकूब केलें आहे काबूलचा अमीर सरहद्दीच्या संबंधानें हिंदुस्थान सरकाराशीं पत्रव्यवहार सुरूं करणार आहे. चीनसरकारचे कांहीं लोक काशगरवरून पामीर येथें जात आहेत कराक नदीच्या काठीं रशियन लोकांची जी वसाहत झाली आहे त्या लोकांनीं तेथील ९०० एकर लागवडीत आणली. हे ठिकाण अफगाण हद्दीच्या अगदीं शेजारी आहे. त्यास हवातसा पाण्याचा पुरवठा नाहीं व शेजारी अफगाणहद्दींत पाण्याचा सुकाळ असल्यामुळें ते पाणी मिळविण्याचा इलाज चालूं आहे रशियन बादशहास भेटण्याकरतां गेलेल्या बुखाऱ्याच्या अमिरास परत बुखाऱ्यास जाण्याची परवानगी न मिळतां त्यांणें रशियन हद्दींत वर्षाचे एक लक्ष रशियन रुपये (रोबल) पेन्शनघेऊन सुखवस्तु राहावे असा त्यास हुकूम झाला आहे अशा रशियातल्या राजकारणी लोकांत बोलवा आहे पामीर पासून बुखाऱ्याच्या राज्यांतील किलिफ शहरा पर्यंत रशियन हद्दीची दोरी मारली जाणार आहे. बुखारा व अफगाणिस्थान यांच्या दरम्यानचा सर्व व्यापार रशियांच्या कस्टम अक्टाप्रमाणें चालणार. बुखाऱ्यातल्या सर्व व्यापाऱ्यांस यापुढें रशियन बाजारातच सर्व खरेदी करावी लागणार. बुखाऱ्यांची हद्द यापुढें रशियनराज्यपैकींच आहे असें समजलें जाणार. या वरून रशिया अगदीं तयारीत आहे असें कित्येकांचें ह्मणणे आहे.

ठा० अ०

सर डब्ल्यू. वेडरबर्न हे पार्लमेंटमध्यें मेंबर निवडून आले हें कळविण्यास आनंद वाटतो.

मुंबई म्यु. प्या. मध्यें तीन बायका क्लार्कांच्या जागीं नेमण्याचें ठरलें आहे.

अमिराचे वकील मि. पनि यांनीं अमीर साहेबांकडून आणलेली खलिता व्हाइसरायापास सादर केला. त्यांत विशेष कांहीं नाहीं फक्त आजारी असल्यामुळें आपणांस लार्ड राबर्टच्या मुलाखतीस जलालाबादेस येण्यास फुरसत झाला नाहीं व सरकारच्या सूचना आपणास मान्य आहे वगैरे मजकूर आहे.

एका पार्शी स्त्रीची ब्यारिस्टरची परिक्षां विलायतेस उतरली असून ती मुंबई येथें बारिस्टरचे काम करणार आहे. ही बाई पहिलीच स्त्री बारिस्टर असल्यामुळें तिला पुष्कळ द्रव्यप्राप्ति होईल असें वाटतें.

डाक्टर हे लोक परिक्षा पास होण्या बरोबर स्वतंत्र दवाखाना काढतात, त्यामुळें बरेच भयंकर प्रसंग लोकांवर गुजरतात तेव्हां या लोकांची परीक्षा पास झाल्यापासून २वर्षेपर्यंत यांनीं कोणत्याही माहितगार अशा डाक्टर लोकांकडे राहून मग स्वतंत्र दवाखाना काढावा असें वाटत आहे.

रत्नागिरी जिल्ह्यातील तांबे उपनावाच्या एका वतनदार खोतानें आपल्या खोती जमिनीतील सागाची झाडें तोडलीं होतीं, त्यावर आपली मालकी आहे हे शाबीत करण्या करितां सदर्हु खोतीवर खटला झाला होता. पहिल्या कोर्टांत खोत आहे ठरून त्यास शिक्षाही झाली. परंतु अपिलांत हायकोर्टानें खालच्या कोर्टाचा ठराव फिरवून असा निकाल दिला कीं, खासगी खोती जमिनींतील कोणत्याही उत्पन्नावर सरकारचा हक्क नाहीं व खोतांना त्या जमिनीत पाहिजे तें उत्पन्न करण्यास मोकळीक आहे. शिवाय राणीसरकारच्या नावानें जें जाहिरनामे वेळोवेळीं प्रसिद्ध झाले आहेत त्यांना कलेक्टर वगैरेंच्या सरक्यूलरांनीं कोणत्याही प्रकारचा बाध येत नाहीं. क० त०

## नमुना नंबर १४३

कोणी स्थानापन्न होतो तेव्हां त्याच कर्ज वसूल करितां येण्यासाठीं सरटीफिकेट मिळावें ह्मणून त्यानें सिव्हिल कोर्टास अर्ज केल्या विषयीं जाहिरात.

सन १८८९ चा आक्ट ७ कलम ४ प्रमाणें.

र. नं. ११ क्लास नं. १५ पैकीं मि. नं. ११/१८९३

वि. अंबादास संतो सिव्हिल जडज्य सा० बहादूर जिल्हा वाशीम यांचे कोर्टांत.

अर्जदार जेठी नवऱ्याचें नांव सुकदेव अ. पा. भाऊ कनडीलाल काळुराम मारवाडी रा. अनसिंग ता०व जि. वाशीम यांस मयत

सुकदेव मारवाडी राहणार असेगांव तालुके मंगरूळपीर जिल्हे वाशीम याच कर्ज वसूल करितां येण्या साठीं सरटीफिकेट मिळावें ह्मणून सदरहु अर्जदार यानें अर्ज केला आहे याज करितां सदर्हु मयत मनुष्याचे माल मिळकतीवर किंवा तिचे कांहीं भागांवर आपला हक्क आहे ह्मणून ज्या मनुष्याचा दावा असेल त्यास जाहिरातीचे द्वारें कळविण्यांत येत आहे कीं त्यांनीं ता. १२ माहे एप्रिल सन १८९३ इ० रोजीं सदर्हु अर्जीची चौकशी होईल त्यावेळीं या कोर्टांत हजर होऊन आपआपले हक्का विषयीं लेखी हकीकत दाखल करावी. आज ता. १७ माहे मार्च सन १८९३ इ०

Ambadas Santo,
सिविल जडज्य
जिल्हे वाशीम


## जाहिरात.

सर्व लोकांस कळविण्यांत येतें कीं, कमेटीचे हद्दींतील कचरा वाहून नेण्याचा, स्लाटर हाऊसचा, स्टेशन धर्मशाळेचा, व आठवडे बाजारचा कर वसूल करण्याचा वगैरे मक्त्यांचा सन १८९३।९४ सालाकरितां हरास तारीख २८ माहे मार्च सन १८९३ इसवी रोजीं सकाळीं ७॥ वाजतां टौन हालांत केला जाणार आहे. ज्यांस घेण्याची इच्छा असेल त्यांनीं सदर्हू तारखेस हजर रहाण्याचें करावें कळावें तारीख ९।३।९३

मु० आफिस आकोला. Gopal Hari Secretary.


☞ हे पत्र आकोलें येथें के० वा० खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.